पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 16 ● 16 ऑगस्ट 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



# आत्मनिर्भर भारतासाठी 'स्वदेशी'चा संकल्प



अध्यक्षीय मनोगत

# पंतप्रधानांचे ‘स्वदेशी’चे आवाहन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर्षी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून केलेल्या भाषणाला मोठे महत्व प्राप्त झाले होते. याचे कारण यावर्षीचा स्वातंत्र्य दिन ‘ऑपरेशन सिंदूर’ आणि अमेरिकेने भारतावर लादलेले ५० टक्के आयात शुल्क या पार्श्वभूमीवर साजरा झाला. त्यामुळे पंतप्रधान लाल किल्ल्यावरील भाषणात काय बोलतात, याकडे देशाचे नव्हे तर जगाचे लक्ष लागले होते. या भाषणाच्या सुरुवातीला पंतप्रधान मोदी यांनी ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये लष्कराने बजावलेल्या कामगिरीचा गौरव केला. दहशतवाद्यांना आणि दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानातील राज्यकर्त्यांना, लष्करशहांना भारतीय सैन्य दलाने जबरदस्त धडा शिकवला. भारतीय सैनिकांच्या या शौर्याला पंतप्रधान मोदी यांनी सलाम केला. त्याचबरोबर पंतप्रधानांनी आपल्या भाषणात ‘ऑपरेशन सिंदूर’मधील भारतात बनवलेल्या शस्त्रास्त्रांच्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क वाढविल्याच्या मुद्याची जगभर चर्चा होत आहे. त्यासंदर्भात पंतप्रधान मोदी यांनी काही दिवसांपूर्वीच वाराणसी येथे बोलताना भारताची भूमिका अत्यंत स्पष्ट शब्दात मांडली होती. भारतीय शेतकऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड करणार नाही, असे श्री. मोदी यांनी जाहीर केले होते. लाल किल्ल्यावरील भाषणात पंतप्रधानांनी कोणत्याच देशाचे किंवा राष्ट्रप्रमुखाचे नाव घेतले नाही. या भाषणात पंतप्रधानांनी देशातील नागरिकांनी यापुढे देशात निर्माण झालेल्या वस्तूंना प्राधान्य द्यावे, यातून देशातील निर्मिती उद्योग आणखी सक्षम होऊन २०४७ पर्यंत ‘आत्मनिर्भर भारता’चे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल, असे नमूद केले. पंतप्रधानांचे हे भाषण कार्यकर्त्यांच्या दृष्टीने दिशादर्शक आहे. सरकारची धोरणे आणि भूमिका सामान्य माणसापर्यंत पोहचवणे हे आपल्या सारख्या सर्व कार्यकर्त्यांचे कर्तव्य आहे. भारतातील उत्पादनांची खरेदी केल्यास त्याचा फायदा देशातील उत्पादकांना होईल, त्यातून देशाची आयात कमी होईल, देशाचा विकास दर वाढेल, असा व्यापक दृष्टीकोन पंतप्रधानांच्या स्वदेशीच्या आवाहनामागे आहे. भारताची आयात कमी झाल्यास आणि निर्यात वाढल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेची प्रगती आणखी वेगाने होईल. सध्या आपली वाटचाल जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने चालू आहे. संरक्षण क्षेत्रातील उत्पादनात भारताने गेल्या ११ वर्षात प्रचंड प्रगती केली आहे. पंतप्रधानांनी आणखी कोण-कोणत्या क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यासाठी युवकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे, याबाबत आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. भारतीय उत्पादने जागतिक दर्जाची बनली पाहिजेत, यासाठी पंतप्रधान नेहमी आग्रही भूमिका घेतात. पंतप्रधानांच्या स्वदेशीचा मंत्राचा जागर प्रत्येक कार्यकर्त्याने यापुढील काळात केला पाहिजे. पंतप्रधानांनी स्वदेशीवर दिलेला भर कसा आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन करणारा राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांचा लेख या अंकात आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने तो आवर्जुन वाचला पाहिजे. समाजात स्वदेशीची भूमिका मांडताना या लेखाचा कार्यकर्त्यांना उपयोग होणार आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आपण राज्यभर ‘हर-घर तिरंगा’ आणि ‘तिरंगा यात्रा’सारखे देशाभिमान प्रकट करणारे अभियान राबविले. या अभियानाला कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य जनतेही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याच अभियानात माजी लष्करी अधिकाऱ्यांचा, कर्मचाऱ्यांचा गौरवही केला गेला. या निमित्ताने आपण राष्ट्रप्रेमाचा हुंकार जागविण्यात यशस्वी ठरलो आहोत.

**रवींद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

आत्मनिर्भर भारतासाठी 'स्वदेशी'चा संकल्प करा ०४



आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्यासाठीच स्वदेशीचा मंत्र १०



संविधानिक संस्थांना बदनाम करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न १३



जातनिहाय जनगणना : विपर्यास, अपप्रचार व वास्तव १७




कलम 370 रद्द झाल्यानंतरची 6 वर्षे २०



गोरगरिबांच्या जीवनात क्रांती घडवणा-या 'जन-धन योजने'ची 11 वर्षे २३



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# आत्मनिर्भर भारतासाठी 'स्वदेशी'चा संकल्प करा



● पंतप्रधान नरेंद्र मोदी

स्वातंत्र्याचा हा भव्य उत्सव आपल्या १४० कोटी भारतीयांच्या संकल्पांचा उत्सव आहे. भारत देशातील एकतेची भावना सातत्याने मजबूत करत आहे. गेली ७५ वर्षे भारताचे संविधान आपल्याला दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करत आहे. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी हे भारताच्या संविधानासाठी जीवन समर्पित करणारे पहिले महान व्यक्तिमत्व होते. सध्या निसर्ग आपली परीक्षा घेत आहे. गेल्या काही दिवसांत आपण भूस्खलन, ढगफुटी आणि इतर अनेक नैसर्गिक आपत्तींचा सामना केला आहे. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून 'ऑपरेशन सिंदूर'मधील शूरवीरांना प्रणाम करण्याची ही एक मोठी संधी आहे. भारताने आता ठरवले आहे की, इतके दिवस सहन केलेल्या अण्वस्त्र हल्ल्याच्या धमक्या आम्ही यापुढे सहन करणार नाही. जर आपले शत्रू भविष्यात दहशतवादी कारवाया करत राहिले, तर आमचे सैन्य त्यांच्या स्वतःच्या अटींवर, स्वतःच्या वेळेनुसार, त्यांना योग्य वाटेल त्या पद्धतीने आणि निवडलेल्या लक्ष्यांवर कारवाई करेल. आम्ही त्याच पद्धतीने तोडीस तोड आणि जबरदस्त प्रत्युत्तर देऊ. भारताने आता निर्णय घेतला आहे की, रक्त आणि पाणी एकत्र वाहणार नाही. सिंधू पाणी करार अन्यायकारक होता, हे लोकांना आता कळून चुकले आहे. सिंधू नदी प्रणालीतील पाणी शत्रूच्या जमिनींचे सिंचन करत होते, तर आपले शेतकरी तहानलेले होते.



## पंतप्रधान मोदींच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे

**संरक्षण स्वावलंबन आणि ऑपरेशन सिंदूर:** ऑपरेशन सिंदूरने भारताच्या संरक्षणातील आत्मनिर्भरतेचे दर्शन घडवले.

**जेट इंजिन निर्मितीतील आत्मनिर्भरता:** पंतप्रधानांनी भारतीय नवोन्मेषक आणि युवकांना भारतातच जेट इंजिन विकसित करण्याचे आवाहन केले, जेणेकरून भविष्यातील संरक्षण तंत्रज्ञान पूर्णपणे स्वदेशी आणि आत्मनिर्भर असेल.

**सेमीकंडक्टर आणि उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील नेतृत्व:** २०२५ च्या अखेरीस मेड-इन-इंडिया सेमीकंडक्टर चिप्स बाजारात येतील, अशी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केली. एआय, सायबर सुरक्षा, डीप-टेक आणि ऑपरेटिंग सिस्टम्समधील नवकल्पना जागतिक स्पर्धात्मकतेसाठी आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**अवकाश क्षेत्रातील स्वावलंबन:** ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करताना पंतप्रधानांनी भारताच्या स्वतःच्या अवकाश स्थानकाच्या महत्त्वाकांक्षी योजनेची घोषणा केली.

**महत्त्वपूर्ण खनिज शोध मोहीम:** ऊर्जा, उद्योग आणि संरक्षणासाठी आवश्यक संसाधनांचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी भारताने राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज मोहीम सुरू केली आहे, ज्याअंतर्गत १,२०० स्थळांचा शोध घेतला जात आहे. या खनिजांवर नियंत्रण मिळवणे धोरणात्मक स्वायत्ततेसाठी महत्त्वाचे असून, यामुळे भारताचे औद्योगिक आणि संरक्षण क्षेत्र आत्मनिर्भर होतील.

**राष्ट्रीय खोल समुद्र ऊर्जा शोध मोहीम:** भारत आपले खोल समुद्रातील ऊर्जा संसाधने वापरणार असून, यामुळे ऊर्जा स्वावलंबन बळकट होईल आणि परदेशी इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी होईल.

**कृषी क्षेत्रातील आत्मनिर्भरता आणि खतनिर्मिती:** शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि राष्ट्रीय अन्नसुरक्षेसाठी खतांचे देशांतर्गत उत्पादन करण्याची तातडीची गरज पंतप्रधान मोदी यांनी अधोरेखित केली. आयात कमी केल्याने कृषी क्षेत्र स्वतंत्रपणे भरभराटीला येईल, शेतकऱ्यांचे कल्याण होईल आणि भारताची आर्थिक सार्वभौमता मजबूत होईल.

**डिजिटल सार्वभौमता आणि स्वदेशी व्यासपीठे:** पंतप्रधानांनी युवकांना स्वदेशी सोशल मीडिया व्यासपीठे आणि डिजिटल पायाभूत सुविधा विकसित करण्याचे आवाहन केले.

**औषधनिर्मिती आणि संशोधनातील आत्मनिर्भरता:** भारताला जगाचे औषधालय म्हणून संबोधताना पंतप्रधान मोदी यांनी संशोधन आणि विकासात अधिक गुंतवणुकीची गरज व्यक्त केली.

**आपल्या** शेतकऱ्यांच्या आणि राष्ट्राच्या हितासाठी आम्हाला सिंधू पाणी करार मान्य नाही. विकसित भारताचा पाया हा आत्मनिर्भर भारत आहे. जेव्हा अवलंबित्व ही सवय बनते आणि आपल्याला ते लक्षातही येत नाही आणि आपण आत्मनिर्भरता सोडून दुसऱ्यांवर अवलंबून राहतो, तेव्हा ते एक मोठे दुर्दैव आहे. आत्मनिर्भरता आपल्या क्षमतेशी जोडलेली आहे आणि जेव्हा आत्मनिर्भरता कमी होऊ लागते, तेव्हा आपली क्षमता देखील सातत्याने कमी होते. म्हणून आपली क्षमता टिकवून ठेवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी आत्मनिर्भर असणे अत्यंत आवश्यक आहे. आज भारत प्रत्येक क्षेत्रात एक आधुनिक परिसंस्था तयार करत आहे आणि ही आधुनिक परिसंस्था आपल्या देशाला प्रत्येक क्षेत्रात आत्मनिर्भर बनवेल. मी देशातील तरुणांना आवाहन करतो की त्यांनी त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना पुढे आणाव्यात. आजची कल्पना येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य घडवू शकते. या प्रवासात मी तुमच्या खांद्याला खांदा लावून उभा राहीन, भारताने कोविड-१९ दरम्यान दाखवलेल्या प्रतिसादातून प्रेरणा घेऊन, जिथे स्वदेशी लस आणि कोविनसारख्या प्लॅटफॉर्मने जगभरात लाखो लोकांचे जीव वाचवले, त्याच नवोन्मेषाला आपल्याला पुढे घेऊन जायचे आहे.आपल्या वैज्ञानिकांनी आणि तरुणांनी एक आव्हान म्हणून आपल्या देशाचे स्वतःचे जेट इंजिन विकसित केले पाहिजे. संशोधक आणि उद्योजकांनी नवीन औषधे आणि वैद्यकीय तंत्रज्ञानासाठी पेटंट सुरक्षित केली पाहिजेत, जेणेकरून भारत केवळ आपल्या आरोग्य गरजाच पूर्ण करणार नाही, तर वैद्यकीय आत्मनिर्भरता आणि नवोन्मेषाचे जागतिक केंद्र बनेल. हे देशाचे विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानवी कल्याणामध्ये नेतृत्व करण्याची क्षमता दर्शवते.

भारताच्या अर्थसंकल्पाचा मोठा भाग अजूनही पेट्रोल, डिझेल आणि गॅस आयात करण्यासाठी खर्च होतो. भारताच्या अपतटीय (ऑफशोअर) ऊर्जा संसाधनांचा उपयोग करण्यासाठी 'राष्ट्रीय जास्त खोलीवरील जलांतर्गत शोध मोहीम' (National Deepwater Exploration Mission) सुरू केली जाईल, ज्यामुळे ऊर्जा आत्मनिर्भरता वाढेल आणि परदेशी इंधनावरील अवलंबित्व कमी होईल. हे पूर्णपणे स्वतंत्र आणि शक्तिशाली भारताकडे एक आणखी पाऊल आहे.'व्होकल फॉर लोकल' या उपक्रमांतर्गत नागरिकांनी आणि दुकानदारांनी



भारत-निर्मित वस्तूंना प्रोत्साहन दिले पाहिजे. स्वदेशीचा अभिमान आणि ताकदीतून निर्माण झाला पाहिजे, सक्तीतून नव्हे. आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी, उद्योजकतेला पाठिंबा देण्यासाठी आणि भारताचा आर्थिक आणि औद्योगिक पाया मजबूत करण्यासाठी दुकानांबाहेर 'स्वदेशी' फलक लावण्यासारख्या स्पष्ट जाहिरातींना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे. भारताची ताकद येथील लोकांमध्ये, नावीन्यपूर्णतेमध्ये आणि आत्मनिर्भरतेच्या प्रतिज्ञेमध्ये आहे. गेल्या दशकात भारताने सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तन केले आहे, पण आता त्याहून अधिक ताकदीने पुढे जाण्याची वेळ आली आहे. आमचे सरकार एक आधुनिक, कार्यक्षम, आणि नागरिक-स्नेही परिसंस्था तयार करण्यासाठी कटिबद्ध आहे, जिथे कायदे, नियम, आणि प्रक्रिया सुलभ असतील, उद्योजकतेला प्रोत्साहन मिळेल आणि प्रत्येक भारतीय विकसित भारताच्या निर्मितीत योगदान देऊ शकेल.' पुढील पिढीच्या सुधारणांसाठी एक कृती गट' (Task Force for Next-Generation Reforms) तयार केला जाईल, जो आर्थिक व्यवहारांशी संबंधित सर्व सध्याचे कायदे, नियम, आणि प्रक्रियांचे मूल्यांकन करेल. हा कृती गट एका निश्चित वेळेत पुढील गोष्टींवर काम करेल: स्टार्टअप्स, एमएसएमई (MSMEs), आणि उद्योजकांसाठी अनुपालन खर्च कमी करणे. मनमानी कायदेशीर कारवाईच्या भीतीपासून मुक्ती देणे. व्यवसाय सुलभतेसाठी कायदे सुलभ करणे.या सुधारणांचा उद्देश नावीन्यपूर्णता, उद्योजकता आणि आर्थिक वाढीसाठी एक सहायक परिसंस्था तयार करणे आहे. सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी आम्ही 'संपृक्तता दृष्टिकोन' (saturation approach) घेऊन काम करत आहोत. ■



भिवंडी- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आ. महेश चौगुले, ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी, भिवंडी ग्रामीण जिल्हाध्यक्ष हर्षल पाटील आदी.




छत्रपती संभाजीनगर- उपस्थिती- इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय मंत्री डॉ.भागवत कराड, श्रीनिवास कुलकर्णी आदी.



कोल्हापूर- उपस्थिती- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महेश जाधव, विजय जाधव, विराज चिखलीकर, अमर साठे, राजू मोरे, धनश्री तोडकर, हेमंत आराध्ये, जयराज निंबाळकर, अमोल पालोजी आदी.




शेवगाव (पाथर्डी)- उपस्थिती - आ. मोनिका राजळे, माजी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, उपनगराध्यक्ष नंदकुमार शेळके, धनंजय बडे, दिगंबर भवार, ज्येष्ठ नेते अशोक चोरमले, सुभाषराव बर्डे, कुंडलिक आव्हाड, संदिप पठाडे, सचिन वायकर, गणेश भालसिंग, युवराज पोटे, शुभम गाडे आदी.



बदनापूर- १८ शाळांतील १० हजार विद्यार्थ्यांचा सहभाग- उपस्थिती- जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, बद्रीनाथ पठाडे-पाटील, विधानसभा प्रमुख अनिलराव कोलते-पाटील, तालुकाध्यक्ष भगवान मात्रे-पाटील, युवामोर्चा तालुकाध्यक्ष भगवान बारगजे, बदनापूर नगराध्यक्ष विलास पाटील-जऱ्हाड, सत्यनारायण गिलडा, पद्माकर जऱ्हाड, प्रदीप साबळे, गणेश कोल्हे आदी.



मुंब्रा- उपस्थिती - रिदा रशीद, तसलीम सर्फराज, फरझाना अन्सारी, गुलशन अनसा, शहिदा खान, शमा मानसुरी, अजिथा शेख.



जालना– उपस्थिती– माजी आमदार कैलास गोरंट्याल, महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, अक्षय गोरंट्याल आदी.



नाशिक– उपस्थिती– जिल्हाध्यक्ष सुनील केदार, लक्ष्मीकांत पारनेकर, नितीन ठाकरे, मंडल अध्यक्ष वसंत उशीर, मुन्ना हिरे, स्वाती भामरे, सुरेश पाटील, नंदकुमार देसाई, अमोल गांगुर्डे, विनोद येवले, योगेश मैद, प्रशांत वाघ, सोनल दगडे आदी.



सिंधुदुर्ग– उपस्थिती– मंडल अध्यक्ष विष्णू चंद्रकांत परब, जिल्हा उपाध्यक्ष बाळु देसाई, ज्येष्ठ कार्यकर्ते शरद चव्हाण, सुहास गवंडळकर, जिल्हा उपाध्यक्ष ॲड.सुषमा खानोलकर, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष सुजाता पडवळ, राजन गिरप, शहर अध्यक्ष श्रेया मयेकर, ईशा मोंडकर, प्रणव वायंगणकर, प्रभाकर गावडे, अर्जुन तांडेल, मानसी परब, सत्यवान पालव, निलेश गवस, संजय केणी, प्रदीप मुळीक आदी.

# आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करण्यासाठीच स्वदेशीचा मंत्र

● **शिवप्रकाश**, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री

अमेरिकेने भारतीय वस्तूंवर प्रथम २५ टक्के आणि नंतर आणखी २५ टक्के असे ५० टक्के आयात शुल्क लादण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने भारतावर दबाव आणण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. भारताच्या कृषी ग्रामीण अर्थव्यवस्थेवर हा थेट हल्ला आहे. या पार्श्वभूमीवरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय नागरिकांना भारतात बनवलेल्या स्वदेशी वस्तू विकत घेण्याचे आवाहन केले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रम्प प्रशासनाला मोजक्याच शब्दात उत्तर दिले आहे. भारतीय शेतकऱ्यांच्या हिताशी कदापि तडजोड केली जाणार नाही, यासाठी कोणतीही किंमत मोजायला आपण तयार आहोत, असे म्हणत पंतप्रधान मोदी यांनी भारत कोणापुढेही झुकणार नाही, हे जगाला दाखवून दिले आहे.

**आत्मनिर्भर** भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वदेशी वस्तूंचा वापर करा, हे पंतप्रधानांचे आवाहन केवळ भावनिक नसून अमेरिकेच्या दबावतंत्राला दिलेले योजनापूर्वक उत्तर आहे. भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था ही केवळ पिकांचे उत्पादन आणि दुग्ध व्यवसायापुरती मर्यादित नाही. ही एक सामाजिक, आर्थिक व्यवस्था आहे. या व्यवस्थेत छोटे शेतकरी, महिलांचे बचतगट, शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करणाऱ्या सोसायट्या, बँका आणि परंपरागत उत्पादन साखळी या घटकांचा समावेश आहे. ८६ टक्के भारतीय शेतकरी हा छोटा शेतकरी आहे. त्याच्याकडे २ हेक्टरपेक्षाही कमी शेतजमीन आहे. शेतीपूरक व्यवसाय म्हणून भारतीय शेतकरी दुग्ध व्यवसायाला प्राधान्य देतात. कोट्यवधी शेतकरी दुग्ध व्यवसायात गुंतलेले आहेत. दुग्ध व्यवसायात महिला आणि भूमीहीन शेतकऱ्यांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. नैसर्गिक कारणांमुळे तसेच व्यवस्थेतील अन्य घटकांमुळे छोटे भारतीय शेतकरी हे सरकारच्या मदतीवर अवलंबून असतात. सरकारकडून शेतीला आवश्यक असणाऱ्या खतासारख्या वस्तूंवर दिली जाणारी अनुदाने, ट्रॅक्टरसारख्या अवजारांवर दिले जाणारे अर्थसहाय्य यावर छोट्या शेतकऱ्यांमधील मोठा वर्ग अवलंबून आहे. शेती आणि दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पंतप्रधान मोदी यांनी भारतीय शेती क्षेत्राचे आणि दुग्ध व्यवसायाचे कोणत्याही परिस्थितीत नुकसान होऊ दिले जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. भारतीय शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी शेतकरी उत्पादक

संघटना निर्माण केल्या जात आहेत. शेतमालाच्या साठवणुकीसाठी शीतगृहे (कोल्ड स्टोरेज) मोठ्या प्रमाणात बांधली जात आहेत. त्याचबरोबर प्रक्रिया उद्योगालाही मोठ्या प्रमाणात चालना दिली जात आहे.

मोदी सरकारने गेल्या ११ वर्षात महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना आखल्या आहेत. कृषी ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचाही मोठा वाटा आहे. त्या दृष्टीने मोदी सरकारने आपल्या धोरणांची आखणी केली आहे. अमेरिकेने आयात शुल्क वाढवण्याची घोषणा केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसी येथील कार्यक्रमात भारतीयांना स्वदेशीचा मंत्र दिला. याच भाषणात 'ऑपरेशन सिंदूर'चा संदर्भ देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, 'ऑपरेशन सिंदूर'मुळे भारतात तयार झालेल्या शस्त्रास्त्रांची ताकद संपूर्ण जगाला कळाली आहे. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य झाले आहे. सध्याच्या काळात जागतिक अर्थव्यवस्थेत अनिश्चितता आणि अस्थिरतेचे वातावरण आहे. अस्थिरतेच्या वातावरणातून बाहेर येण्यासाठी प्रत्येक देश स्वत:चे हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करत आहे. प्रत्येक देश आपला फायदा पाहत असताना भारताने आपला फायदा का पाहू नये? भारत जगातील तिसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनण्याकडे वाटचाल करीत आहे. असे असताना आपण आपल्या देशाचे हित बघितलेच पाहिजे. देशाचा फायदा कशात आहे, हे पाहूनच आपल्याला वागावे लागणार आहे. शेतकरी, लघु उद्योजक, युवक या वर्गाचे हित डोळ्यापुढे ठेऊनच मोदी सरकारने आपली आंतरराष्ट्रीय व्यापार नीती आखली आहे. तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचे ध्येय गाठण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी, विचारवंत, बुद्धिवंत आणि एकूणच संपूर्ण समाजाने पक्षीय विचार बाजूला ठेऊन स्वदेशीचा मंत्र आचरणात आणला पाहिजे. प्रत्येकाने स्वदेशी उत्पादने विकत घेण्याचा आणि स्वदेशी वस्तू वापरण्याचा निर्धार करणे आवश्यक आहे. गेल्या १० वर्षात भारताची अर्थव्यवस्था निश्चित गतीने प्रगतीची नवी शिखरे गाठत आहे. २०१३-१४ मध्ये भारत हा जगातील ११ व्या क्रमाकांची अर्थव्यवस्था असलेला देश होता. आज आपण जगातील चौथ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनलो आहोत आणि आपली वाटचाल तिसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनण्याकडे चालू आहे. आपल्या भारताचा विकासदर ६.४ टक्के एवढा आहे. कृषी आणि संरक्षण क्षेत्रात भारताचा संपूर्ण जगात दबदबा आहे. जागतिक बाजारपेठेतील भारताचा वाटा गेल्या काही वर्षात लक्षणीय प्रमाणात वाढला आहे. मोदी सरकारच्या गरीब कल्याणाच्या योजनामुळे २४ कोटीहून अधिक लोक दारिद्र्यरेषेबाहेर आले आहे. पायाभूत सुविधा विकास क्षेत्रात भारताने गेल्या १० वर्षात मोठी प्रगती केली आहे. एकीकडे भारताचा वेगाने विकास होत असताना भारताने आपले सामर्थ्यही जगाला दाखवले आहे. आपण भगवान शंकराची पूजा करत असलो तरी देशाच्या सुरक्षेचा विषय येतो तेव्हा आपण 'काल भैरव'बनू शकतो, हे 'ऑपरेशन सिंदूर', सर्जिकल आणि एअर स्ट्राईकद्वारे आपण संपूर्ण जगाला दाखवून दिले आहे. वेगाने होत असलेला आर्थिक विकास, देशाच्या सुरक्षेसाठी घेतलेली कणखर भूमिका यामुळे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताच्या नावाचा दबदबा तयार होऊ लागला आहे. मात्र याच कारणांमुळे भारताचे शत्रूही वाढू लागले आहेत. अमेरिकेतील कृषी व्यवस्थेचे औद्योगिकीकरण झाले आहे. अमेरिकेची कृषी व्यवस्था सरकारी अनुदानावर पोसली गेली आहे. याउलट भारताची शेती व्यवस्था ही बहुसंख्य छोट्या शेतकऱ्यांची आहे. भारताची ५५ टक्क्यापेक्षा अधिक लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. भारताच्या विकासदरामध्ये शेती क्षेत्राचा वाटा १५ टक्के आहे. भारतातील शेती ही लहरी हवामानावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. भारताची शेती आणि अमेरिकेची शेती यात तुलनाच होऊ शकत नाही. अत्यंत विपरीत स्थितीत भारतीय शेतकरी पीके घेत असतो. त्यामुळेच दोन्ही देशांचे आयात शुल्क सारखे असावो, असा आग्रह धरणे योग्य ठरत नाही. भारतात वस्त्रोद्योग,

**गेल्या ३ वर्षांपासून भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत आहे. यावर प्रक्रिया करून ते युरोपीय देशांना भारत विकत असल्यामुळे ट्रम्प प्रशासन संतापले आहे. मात्र अमेरिका रशियाकडून करत असलेल्या आयातीबद्दल ट्रम्प प्रशासन गप्प आहे. परराष्ट्र मंत्रालय विभागाने अमेरिका आणि युरोपीय देश रशियाबरोबर कोणत्या वस्तूंचा किती रकमेचा व्यापार करतात, याची माहिती प्रसिद्ध करून अमेरिकेला सणसणीत उत्तर दिले आहे.**





**अमेरिकेबरोबरच्या व्यापारात मत्स्यपालन आणि दुग्ध व्यावसायासारखी क्षेत्रे अमेरिकी कंपन्यांना व्यावसायासाठी खुली करण्याची मागणी मोदी सरकारने धुडकावून लावली आहे. यामुळेच भारतावर आयात शुल्क वाढवून दबाव आणण्याचे प्रयत्न अमेरिकेकडून सुरू आहेत.**

अन्न–धान्य, साखर, दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन ही क्षेत्रे शेतीशी निगडीत आहेत. अमेरिकेसाठी कृषी आणि दुग्ध व्यवसाय ही क्षेत्रे आयातीसाठी खुली करणे देशहितासाठी योग्य नाही. अमेरिकेच्या आग्रहामुळे भारताने व्यापार धोरण बदलले तर भारतीय बाजारपेठेत अमेरिकेतील दुग्धजन्य उत्पादनांचा अरक्षशः पूर येईल. अमेरिकेची दुग्धजन्य उत्पादने अत्यंत स्वस्त आहेत. अमेरिकी कंपन्यांचा शेती आणि दुग्ध व्यवसाय यासारख्या क्षेत्रात प्रवेश झाला तर ग्रामीण भागातील महिलांचे स्वयंसहाय्यता गट तसेच 'अमूल'सारख्या दुग्ध व्यवसायातील मोठ्या सहकारी संस्थांवर विपरीत परिणाम होईल. दुग्ध व्यवसायाच्या क्षेत्रातील ग्रामीण भारतातील अनेक सहकारी संस्था अडचणीत येतील. भारतातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल व अन्य उत्पादने कवडीमोल दराने विकावी लागतील. तसे झाले तर ग्रामीण भारतात आर्थिक पेचप्रसंग निर्माण होईल, ग्रामीण भारतामध्ये प्रचंड बेरोजगारी होईल, रोजगारासाठी ग्रामीण भारतातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर चालू होईल, याचा परिणाम म्हणून ग्रामीण भारतात असंतोष तयार होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेती आणि शेतकऱ्यांचा विकास डोळ्यापुढे ठेऊन गेल्या १० वर्षात अनेक योजना सुरू केल्या आहेत. गेल्या १० वर्षात शेती क्षेत्रासाठीची अर्थसंकल्पातील तरतूद ५ पटीने वाढली आहे. २०१३–१४ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात शेती क्षेत्रासाठी २१ हजार ९३३ कोटी रु. एवढी तदतूद करण्यात आली होती. २०१३–२४ मध्ये शेती क्षेत्रासाठीची तरतूद १.२५ लाख कोटी रू. पर्यंत पोहचली. देशातील सहकारी क्षेत्र महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला सहाय्य करणे, शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी पाठबळ देणे, महिला सुरक्षेसाठी प्रयत्नशील राहणे, दुग्ध व्यवसाय आणि सहकारी चळवळीला पाठिंबा देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हीच गोष्ट वाराणसी येथील सभेत सांगितली आहे. स्वदेशी संकल्पना तात्पुरत्या काळासाठी नसून स्वदेशी हा भारताचा आत्मा आहे. देशाची एकता, देशभक्ती यासाठी पंतप्रधान मोदी यांनी केलेले स्वदेशीचे आवाहन अत्यंत महत्वपूर्ण आहे. ब्रिटीशांची भारतावर सत्ता असताना विदेशी कपड्यांची होळी करून स्वातंत्र्य सैनिकांनी, सामान्य माणसाने राष्ट्रभक्ती दाखवून दिली होती. ब्रिटीशांविरोधात स्वातंत्र्यासाठी लढताना स्वदेशी हाच मुख्य आधार होता. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार असताना १९९८ मध्ये भारताने पोखरण येथे अनुचाचणी केली. त्यावेळी अमेरिकेने भारतावर निर्बंध लादले होते. या निर्बंधांना भारताने स्वदेशीचा मंत्र जागवून उत्तर दिले होते. अमेरिकेच्या निर्बंधांना भीक न घालता भारत आपल्या भूमिकेवर ठाम राहिला. स्वदेशीच्या आग्रहामुळे देशातील उद्योगांना उत्तेजन मिळते, त्याचबरोबर महत्वाची गोष्ट म्हणजे विदेशी वस्तूंवरील प्रमाणाबाहेर अवलंबित्व कमी होते. स्वदेशी वस्तूंचा वापर वाढला तर देशातील उद्योग आणखी सक्षम होतील. त्याचा फायदा देशाच्या विकासदरावर होईल. त्यामुळे स्वदेशी हीच काळाची गरज आहे, हे प्रत्येक भारतीयाने ओळखले पाहिजे. ■

# संविधानिक संस्थांना बदनाम करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न




**आपल्या आरोपांबाबत ७ दिवसात निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेप्रमाणे शपथपत्र दाखल करा अन्यथा खोटे आरोप केल्याबद्दल देशाची माफी मागा, असे आव्हान केंद्रीय निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना पत्रकार परिषद घेऊन जाहीरपणे दिले आहे.**

● **भूपेंद्र यादव**, केंद्रीय कामगार मंत्री

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर खोटे आरोप करण्याचा सपाटाच लावला आहे. हे आरोप करताना राहुल गांधी हे निवडणूक आयोगाच्या म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकतेवर शंका प्रकट करत आहेत. महाराष्ट्रातील विधासनभा निवडणुकीच्या निकालावरून राहुल गांधी हे गेले ६ महिने निवडणूक आयोगावर कोणत्याही पुराव्यानिशी आरोप करत आहेत. त्यांचा प्रमुख आक्षेप आहे तो विधानसभा निवडणुकीत मतदारांची संख्या वाढल्याचा.

**२०२४** च्या विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील मतदारांची एकूण संख्या होती ९ कोटी ७१ लाख ४१ हजार २८९. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदारांची संख्या होती ९ कोटी ३० लाख ६१ हजार ७६०. याचा अर्थ लोकसभा ते विधानसभा निवडणुकी दरम्यान महाराष्ट्रातील मतदारांची संख्या ४१ लाखांनी वाढली. मात्र राहुल गांधींनी आपल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील मतदारांची संख्या १ कोटीने वाढल्याचे ठोकून दिले. राहुल गांधींनी आपल्या मनानेच ६० लाख मतदार वाढवले.

लोकसभा निवडणुकीनंतर काही महिन्यांनी विधानसभा निवडणूका झाल्यास मतदारांची संख्या वाढते, असे अनेकदा दिसून आले आहे. २००४ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता राज्यात होती. त्यावेळच्या विधानसभा निवडणुकीत १ कोटी नवीन मतदार नोंदले गेले. २००९ मध्ये ७५ लाख नवीन मतदार नोंदले गेले. २०१४ मध्ये ६३ लाख नवीन मतदारांची नोंदणी झाली. गेल्या ४ विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदार कमी संख्येने वाढले.

निकालाबद्दल शंका असणे, यात काही गैर नाही. त्याबद्दल निवडणूक आयोगाकडे, न्यायालयाकडे दाद मागण्यातही काहीच चुकीचे नाही. संविधानाने प्रत्येकाला तो हक्क दिला आहे. या हक्काचा वापर करून राहुल गांधी हे निवडणूक आयोगाकडे किंवा सर्वोच्च न्यायालयात जाऊन निकालाविरोधात दाद मागू शकतात. मात्र त्या मार्गाने राहुल गांधींना जायचे नाही. त्यांना फक्त निवडणूक आयोगासारख्या संविधानाने निर्माण झालेल्या संस्थांना बदनाम करायचे आहे. पत्रकार परिषदेनंतर निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना आपल्या आरोपांविषयी आयोगाच्या पद्धतीप्रमाणे शपथपत्र सादर करण्यास सांगितले. मात्र राहुल गांधींनी आपण शपथपत्र सादर करणार नाही, असे सांगून टाकले. निवडणूक आयोगाला बदनाम करण्याचा राहुल गांधींचा हा 'हिट ॲण्ड रन' फॉर्म्युला संपूर्ण देशाला ठाऊक झाला आहे.

वाढलेल्या मतांमुळे भारतीय जनता पार्टीचा विजय झाला, असे रेटून सांगणाऱ्या राहुल गांधींनी आपल्या आघाडीतील काही विजयी उमेदवारांची मते आणि त्या मतदारसंघात लोकसभा निवडणुकीनंतर वाढलेल्या मतदारांची संख्या लक्षात घेतलेली नाही. किंबहुना ही माहिती असून सुद्धा ती जाहीरपणे सांगण्याचे धाडस त्यांच्याकडे नाही.

**मुंब्रा-कळवा मतदारसंघात ४१ हजार ६६३ मते वाढली, या मतदारसंघात शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड हे ९६ हजारांहून अधिक मतांनी विजयी झाले. भिवंडी पूर्व मतदारसंघात ३७ हजार ५३५ मतदार वाढले. या मतदारसंघात महाविकास आघाडीतील समाजवादी पार्टीच्या रईस कासम शेख ५२ हजार १५ मतांनी विजयी झाले. खेड-आळंदी मतदारसंघात उबाठाचे बाबाजी काळे ५१ हजार ७४३ मतांनी विजयी झाले. या मतदारसंघात २३ हजार ९८९ मतदार वाढले होते. परभणी मतदारसंघात १५ हजार १६२ मतदार वाढले होते. या मतदारसंघात उबाठाचे राहुल पाटील ३० हजारांहून अधिक मतांनी विजयी झाले. माढा (जि. सोलापूर) मतदारसंघात १५ हजार ५९ मतदार वाढले. या मतदारसंघात शरद पवार गटाचे अभिजीत पाटील ३० हजार ६३१ मतांनी विजयी झाले. नागपूर उत्तर मतदारसंघात २३ हजार ४२१ मतदार वाढले. या मतदारसंघात काँग्रेसचे नितीन राऊत २८ हजार ४६७ मतांनी विजयी झाले.**

सांगोला, तासगाव या मतदारसंघातही जेवढे मतदार वाढले त्यापेक्षा अधिक मतांनी शेकाप, शरद पवार गटाचे उमेदवार विजयी झाले. **नागपूर पश्चिम मतदारसंघात २३ हजार एवढे मतदार वाढले. या मतदारसंघात काँग्रेसचे विकास ठाकरे हे ५ हजार ८२४ मतांनी विजयी झाले.**




**२०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील मतदारांची एकूण संख्या होती ९ कोटी ७१ लाख ४१ हजार २८९. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदारांची संख्या होती ९ कोटी ३० लाख ६१ हजार ७६०. याचा अर्थ लोकसभा ते विधानसभा निवडणुकी दरम्यान महाराष्ट्रातील मतदारांची संख्या ४१ लाखांनी वाढली. मात्र राहुल गांधींनी आपल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्रातील मतदारांची संख्या १ कोटीने वाढल्याचे ठोकून दिले. राहुल गांधींनी आपल्या मनानेच ६० लाख मतदार वाढवले.**

## तेलंगणा, कर्नाटकातही मतदार वाढले होते

**महाराष्ट्रातील मतदारांची वाढ अचानक किंवा गुपचूप नाही, तर SVEEP (Systematic Voters' Education and Electoral Participation) अंतर्गत पार पडलेल्या मोठ्या नोंदणी मोहिमांमुळे झाली. फक्त ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या दोन आठवड्यांच्या विशेष कॅम्प्समधून १.६९ दशलक्ष (१६.९ लाख) नवीन मतदार नोंदवले गेले. यामध्ये १० लाख महिला, ३.६७ लाख १८-१९ वयोगटातील तरुण मतदार, ७.५५ लाख २०-२९ वयोगटातील युवक, आणि थर्डजेंडर मतदारांचा समावेश आहे.**

● तेलंगणामध्ये महाराष्ट्र पेक्षा जास्त मतदार वाढलेत: नोव्हेंबर २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत तेलंगणातील मतदारसंख्या ३ कोटी १७ लाख ३२ हजार ७२७ होती. मे २०२४ लोकसभा निवडणुकीत ती ३कोटी ३२ लाख ३२ हजार ३१८ वर गेली म्हणजेच ४.७३% (१४,९९,५९१) वाढ.

■ लोकसभा काँग्रेसला मिळालेली मते - ३९.६९%

■ विधानसभा काँग्रेसला मिळालेली मते- ४०.१०% - लोकसभा -भाजपाला मिळालेली मते : १४%

■ विधानसभा-भाजपाला मिळालेली मते - ३५.०८%

■ तेलंगणा राष्ट्र समितीची मतांची विधानसभेची टक्केवारी ३७.३५% होती. लोकसभा निवडणुकीत ही टक्केवारी १६.६८% वर घसरली. तेलंगणा राष्ट्र समितीचे मतदार भाजपाकडे वळले यातून स्पष्ट झाले.

■ २०१९ ते २०२४ दरम्यान काँग्रेसच्या जागा ३ वरून ८, भाजपाचे ४ वरून ८, तेलंगणा राष्ट्र समितीच्या ९ वरून ० झाल्या म्हणजेच मत स्पष्टपणे ट्रान्स्फर भाजपाकडे झाले आहेत यातून दिसून येतंय.

● कर्नाटकमध्येही मतदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

■ कर्नाटकातील मतदारसंख्या एका वर्षात ४.५०% (२३ लाख ६० हजार ७७५) ने वाढली.

■ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची मतांची टक्केवारी ४२%, लोकसभेत वाढून ४५.४३%. भाजपाची मतांची टक्केवारी विधानसभा ३६% आणि लोकसभा ४६.०६% इथे वाढ झाली.

■ २०१९ लोकसभा निवडणुकीत भाजपाची टक्केवारी ५१.३८% होती, ती कमी झाली. म्हणजेच मतदार वाढ काँग्रेसच्या राज्यातही स्वाभाविक आहे, पण तिथे राहुल गांधींनी गप्प राहणं पसंत केलं.

**भारतीय जनता पार्टीने ठाकरे यांच्या विजयावर शंका व्यक्त केली नाही.** मतांची चोरी म्हणून राहुल गांधी सातत्याने आरोप करत आहेत, त्यातील वस्तुस्थिती वरील आकडेवारीवरून लक्षात येईल.




मतदारांची नोंदणी करण्यासाठी प्रत्येक राज्याचा निवडणूक आयोग काम करत असतो. मतदारयादीतील नाव चुकीचे असणे, नाव वगळले जाणे, पत्ता चुकीचा असणे अशा अनेक चुका-गडबडी मतदारयादीत पूर्वीपासून होत आहेत. राहुल गांधींनी आदित्य श्रीवास्तव या मतदाराचे नाव ३ शहरात असल्याचा आरोप केला होता. यासाठी त्यांनी आदित्य श्रीवास्तवचा ईपीक नंबरही जाहीर केला होता. त्यावर आदित्य श्रीवास्तव ने केलेला खुलासा 'लोकमत'ने प्रसिद्ध केला आहे. या खुलाशात तो म्हणतो की, "२०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत मी मुंबईत मतदान केले होते. मी आधी लखनौ येथे राहायला होतो. तिथून मतदान कार्ड मुंबईत ट्रान्सफर केले. २०१७-१८ या काळात मी मतदार म्हणून मुंबईत नोंदणी केली. तसेच २०२१ मध्ये मी बंगळुरूला शिफ्ट झालो. त्यानंतर पुन्हा निवडणूक आयोगाकडे मी मतदार कार्ड ट्रान्सफर करण्यासाठी अर्ज दिला. मुंबई सोडल्यानंतर मी पुन्हा तिथे मतदान करण्यासाठी गेलो नाही." राहुल गांधी यांनी माझी आणि माझ्या कुटुंबियांची माहिती पत्रकार परिषदेत



# राहुल गांधींचा खोटेपणा उघड केल्याने काँग्रेस नेत्याला मंत्रीपद गमवावे लागले

**राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत कर्नाटकमधील एका लोकसभा मतदारसंघात वाढलेल्या मतदार संख्येचा उल्लेख केला. घराच्या एकाच पत्त्यावर ८० मतदार नोंदले गेल्याचे त्यांनी दाखवून दिले. कर्नाटकात काँग्रेसच्या सरकार असताना हा प्रकार कसा घडला, असा प्रश्न सिद्धरामय्या सरकारमधील राजण्णा या मंत्र्याने जाहीररित्या विचारला. या मंत्र्याच्या प्रश्नामुळे राहुल गांधींची नाचक्की झाली. त्यामुळे राजण्णा यांना तातडीने मंत्रीपदावरून काढून टाकण्यात आले.**

सांगायला नको होती, असेही आदित्यने सांगितले आहे. एकाच मतदाराची नावे अनेक ठिकाणी असणे ही नवीन गोष्ट नाही. अनेकदा मतदारच याला जबाबदार असतात. काहीवेळा मतदाराने कळवून सुद्धा निवडणूक आयोगाकडून अशा प्रकरणात मतदारयादीतून नाव वगळले जात नाही. बिहारमध्ये याच कारणासाठी मतदारयाद्यांचे शुद्धीकरण करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. अनेक घुसखोरांनी विशेषत: बांग्लादेशी नागरिकांनी आणि रोहिंग्यांनी आपली नावे मतदारयादीत समाविष्ट करून घेतली आहेत. यासाठी बिहारमध्ये निवडणूक आयोगाने मतदारयाद्यांच्या सखोल तपासणीसाठी मोहीम हाती घेतली आहे. त्याला राहुल गांधी, तेजस्वी यादव ही मंडळी विरोध करत आहेत. बिहारमध्ये सुमारे ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. या मतदारांना आपण भारतीय नागरीक असल्याचे पुरावे सादर करता आले नाहीत. निवडणूक आयोगाने बिहारमधील नवीन मतदारयादी प्रसिद्ध करून त्यातील नावांना ८ दिवसात आक्षेप नोंदवण्याचे आवाहन केले होते. मात्र राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस, कम्युनिस्ट यापैकी एकाही विरोधी पक्षाने निर्धारीत मुदतीत आक्षेप नोंदविले नाहीत.

राहुल गांधींनी खोटेनाटे आरोप करताना सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकतेबद्दल शंका घेऊन त्यांचा अवमान केला आहे. आम्ही सत्तेवर आल्यावर या अधिकाऱ्यांनी घरी पाठवू, असे उद्दाम उद्‌गार राहुल गांधींनी काढले आहे. निवडणुकीत मतदार सातत्याने नाकारत असल्यामुळे हताश झालेल्या राहुल गांधींनी निवडणूक आयोग, न्यायालय, संसद यासारख्या संविधानिक संस्थांच्या कारभाराबद्दल संशय निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताची किती विमाने पडली, हे जाहीर करा, अशी मागणी करत राहुल गांधींनी भारतीय लष्कराचाही अवमान केला आहे. भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताचे काहीच नुकसान झाले नाही, असे पूर्वीच स्पष्ट केले होते. असे असतानाही भारताची किती विमाने पडली, हे जाहीर करा, यासारखी भाषा वापरत राहुल गांधींनी आपण पाकिस्तानचीच भाषा बोलत आहोत, हे दाखवून दिले होते. राफेल विमान खरेदी प्रकरणात खोटे आरोप केल्याबद्दल याच राहुल गांधींनी सर्वोच्च न्यायालयात माफी मागितली होती. निवडणूक आयोगावरील आरोपातही त्यांच्यावर अशीच वेळ येणार आहे. ■


# जातनिहाय जनगणना : विपर्यास, अपप्रचार व वास्तव

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

> ‘जातनिहाय जनगणना’ या विषयावर गेले काही महिने प्रसार माध्यमांमधून खूपच गदारोळ सुरु होता. पण होऊ घातलेल्या सन २०३१च्या जनगणनेमध्ये जातनिहाय गणना करण्याचा निर्णय सरकारने जाहीर केल्यानंतर ह्या विषयावर आरडाओरडा करणारे सगळे एकाएकी गप्प झाले आहेत. वर्तमानपत्र व प्रसारमाध्यमांमधील काहीजण आपला मुद्दा पुढे रेटण्यासाठी ह्या मुद्यावर काही ना काही बोलत अथवा लिहित असले तरी त्यात वस्तुस्थितीचा अभाव असून अपप्रचारासाठी मुद्दाम केलेला विपर्यास मात्र भरपूर आहे.

**भारतात** आज ज्या पध्दतीची जनगणना केली जाते तिची सुरुवात इंग्रजांनी १८६५ साली केली. सन १८७१ पासून दर दहा वर्षांनी ती केली जाते. सन १९३१ पर्यंत जातनिहाय जनगणना होत होती आणि त्याची नोंदही होत होती. पण १९४१ च्या जनगणनेत जातनिहाय नोंद झाली की नाही याचा तपशिल कुठे मिळत नाही कारण ती जनगणना इंग्रजांनी फाळणीच्या दृष्टीने महत्वाची मानली होती. त्याच्यामध्ये हिंदू-मुस्लिम जनगणना हाच त्यांच्यासाठी महत्वाचा मुद्दा होता आणि तेव्हा बहुदा इंग्रजांनी जातनिहाय जनगणनेला दुय्यम स्थान दिले असावे किंवा पडदा टाकला असेल पण त्या बाबतच्या कागदोपत्री नोंदी फारशा पाहायला मिळत नाहीत.

इंग्रज गेल्यानंतर स्वतंत्र भारतातील पहिली जनगणना १९५१ साली झाली. १९५१ च्या जनगणनेमध्ये जातनिहाय जनगणना करायची नाही’ असा निर्णय त्यावेळच्या पं.नेहरूंच्या सरकारने घेतला होता. तेव्हा ते काँग्रेसचे सरकार नव्हते तर ते राष्ट्रीय सरकार होते. या सरकारमध्ये काँग्रेस शिवाय अन्य पक्षांचे नेतेही सामील झाले होते. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेही त्या मंत्रिमंडळात होते. त्या सरकारचा हा निर्णय एका अर्थाने तो सर्वसहमतीचा निर्णय होता. त्यावेळेला लोकसभा सुद्धा अस्तित्वात आली नव्हती. त्यावेळेस देशाची संविधान सभा अस्तित्वात होती. नोव्हेंबर १९४९ मध्ये संविधान स्वीकारून २६ जानेवारी १९५० ला आपण स्वत:ला प्रजासत्ताक म्हणून घोषित केले. संविधानाच्या निर्मितीसाठी जी यंत्रणा ‘संविधान सभा’ म्हणून काम करत होती तीच



२७ जानेवारी १९५० पासून 'लोकसभा' म्हणून काम करायला लागली. त्या अर्थाने 'जातनिहाय जनगणना न करण्याचा हा निर्णय' संविधान सभेनेच घेतला होता. संविधान सभेमध्ये देशातील सर्वपक्षीय नेत्यांचा समावेश होता. त्यामुळे '१९५१ सालच्या जनगणनेमध्ये जातनिहाय गणना करायची नाही' हा निर्णय सर्वांच्या सहमतीनेच घेतलेला निर्णय होता. त्याच्या मागचे मुख्य कारण हे होते की, आपल्याला जातव्यवस्था नष्ट करायची आहे. त्या व्यवस्थेबरोबर आलेले जे दुर्गुण आहेत ते नष्ट करायचे आहेत. मुख्यत:त्याचा रोख अस्पृश्यतेवर, उच्च-नीच प्रवृत्ती वर होता. या प्रथा, परंपरा नष्ट करण्यासाठी आपण जातनिहाय जनगणना न करणे हे योग्य म्हणून तो निर्णय झाला. आतापर्यंत तो निर्णय अबाधित होता.

असे असताना '७५ वर्षांनंतर पुन्हा जातनिहाय जनगणना करण्याची गरज का पडली? आपण पुन्हा मागे का जातो आहोत' असा प्रश्न स्वाभाविकपणे विचारला जातो. परंतु गेल्या ७५ वर्षांमध्ये बदललेली परिस्थिती, त्यातून निर्माण झालेले नवे सामाजिक प्रश्न लक्षात घेऊन ही चर्चा केली पाहिजे. त्या बदललेल्या परिस्थितीत ह्या प्रश्नाचे उत्तर आहे. देशातील अनुसूचित जाती-जमातींना आपण संविधान तयार करतानाच आरक्षण दिले. अस्पृश्यतेमुळे अनुसुचित जातींवर जो सामाजिक अन्याय झाला होता त्याचे निवारण करण्यासाठी अनुसूचित जातींना आरक्षण देण्याची तरतूद केली गेली. तर अनुसुचित जमाती नैसर्गिक कारणांमुळे समाजाच्या, राष्ट्रजीवनाच्या मुख्य प्रवाहापासून तोडल्या गेल्या होत्या, त्यामुळे त्यांच्या प्रगतीसाठी मर्यादा आल्या होत्या, काही प्रमाणात त्यांच्यावर अन्याय झाला होता. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांचे प्रगतीचे मार्ग मोकळे करण्यासाठी संविधानाने त्यांनाही आरक्षण दिले. मात्र ह्या दोन वर्गांखेरीज अन्य कोणालाही, कोणत्याही कारणासाठी आरक्षण द्यायला संविधान सभेने व्यापक चर्चेनंतर स्पष्ट नकार दिला होता. त्या पार्श्वभूमीवर १९५१ च्या जनगणनेत जातनिहाय गणती न करण्याचा राष्ट्रीय सरकारने घेतला होता. हा निर्णय घेणारे मंत्रिमंडळातील बहुतेक सदस्य संविधान सभेचे सदस्य होतेच. पूर्वी झालेल्या चर्चा व निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग होता. त्या परिस्थितीत व संदर्भांमध्ये तो निर्णय तर्कशुद्ध व योग्य होता.

असे असले तरी सामाजिक न्यायाची गरज म्हणून



गोपीनाथ मुंडे यांनी ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेचा मुद्दा लोकसभेत उपस्थित केला होता.

आरक्षणाचे तत्व आपण मान्य केले होते. त्यानुसार १९५१ सालच्या जनगणनेतसुध्दा अनुसुचित जाती जमातींची गणना केलेली होतीच, कारण त्याशिवाय तत्वत: मान्य केलेले आरक्षण व्यवहारात देणे शक्य नव्हते. म्हणजे 'जातनिहाय जनगणना करायची नाही' असे एका बाजुला म्हणत असतानाच मर्यादित प्रमाणात का होईना पण जातनिहाय गणना करून तिच्या नोंदी ठेवल्या जात होत्या आणि त्या जाहीरही केल्या जात होत्या. ती व्यवस्था १९५१ सालापासून आजतागायत तशीच चालू आहे. कारण आरक्षण द्यायचे असेल तर त्या त्या जातीसमूहांची गणना आवश्यक आहे.

आपण संविधान स्वीकारले त्या घटनेला ह्या वर्षी ७५ वर्षे पूर्ण झाली. ह्या ७५ वर्षांमध्ये अनेक नवे प्रश्न निर्माण होत गेले. त्या प्रश्नांची सोडवणूक करताना वेगवेगळ्या प्रकारची आरक्षणे नव्याने द्यावी लागली. सामाजिक न्यायाचे तत्व वेगवेगळ्या वर्गांना लागू करण्याचा आग्रह वेगवेगळ्या वेळेला झाला. अशा प्रश्नांमधून १९७५ ते ८५ च्या दशकामध्ये मंडल आयोग आला. १९७५ मध्ये मंडल आयोगाची नेमणूक इंदिरा गांधींनी केली होती. मात्र या आयोगाच्या शिफारशी इंदिरा गांधी सरकारने स्वीकारल्या नव्हत्या. जनता पार्टी सरकारने १९७७-७८ साली त्या स्वीकारल्या. पण त्यावेळेला त्यांची अंमलबजावणी सुरु झाली नाही. त्या जनता पार्टीमध्ये भाजपाचा पूर्वावतार जनसंघ सहभागी होता. किंबहुना मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करा हा आग्रह धरण्यामध्ये जनसंघच पुढे होता. संघ परिवाराने त्यासाठी पुढाकार घेतला होता. भारतीय जनता युवा मोर्चाचे कार्यकर्ते या मागणीसाठी देशभर आंदोलन करत होते. त्यामध्ये आपल्या पक्षातील सगळ्यांचा सहभाग होता. जनता पार्टी सरकारने घेतलेल्या




त्या निर्णयामुळे आरक्षणाची चौकट पूर्ण बदलली. अन्य मागासवर्गीय (OBC) हा मुद्दा त्यात नव्याने समाविष्ट झाला. संविधानाने आरक्षणाची जी मर्यादा घालून दिली होती ती सुद्धा बदलली, ही मर्यादा वाढवावी लागली. जेव्हा नवा वर्ग आरक्षणाच्या चौकटीत आणला जातो तेव्हा त्या नव्या वर्गाची सुध्दा जातनिहाय जनगणना झाली पाहिजे, त्याशिवाय या वर्गाला दिलेल्या आरक्षणाची अंमल बजावणी योग्य पद्धतीने करता येणार नाही. आरक्षणाची पहिली गरज ही शास्त्रशुध्द गणनाच असते. शास्त्रशुध्द गणना जोपर्यंत होत नाही तोपर्यंत संबंधित वर्गाला योग्य पद्धतीने आरक्षण देता येणार नाही. मंडल आयोगाच्या शिफारशी लागू केल्यानंतर तो अनुभव स्वाभाविकपणे येऊ लागला.

मंडल आयोगाच्या अहवालानुसार देशामध्ये जवळजवळ साडेचार हजारांपेक्षा अधिक समूह त्यांनी अन्य मागासवर्गीय श्रेणीत आणले होते. त्यात स्वाभाविकपणे खूप वाद आहेत. त्यामुळे हा जातनिहाय जनगणनेचा मुद्दा हळुहळू पुढे येऊ लागला. हा मुद्दा पहिल्यांदाच व अचानक गेल्या तीन चार वर्षांमध्ये राहुल गांधी, लालू यादव यांनी पुढे आणला असे जे चित्र सध्या रंगवण्याचा प्रयत्न केला जात आहे, तो बरोबर नाही. वास्तविक, हा मुद्दा पुढे आणणे, त्याच्यासाठी आग्रह धरणे हे काम भारतीय जनता पार्टीने आणि तेही महाराष्ट्रातूनच सुरू केले.

साधारणपणे ही गोष्ट २००७-०८ सालची आहे. महाराष्ट्र भाजपाचे माजी अध्यक्ष, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री कै.गोपीनाथजी मुंडे या विषयाचे आग्रही होते. कारण ते अशा समुदायांमधून पुढे आलेले नेते होते, की ज्यांना सामाजिक व्यवस्थेमध्ये जे स्थान मिळायला हवे होते ते २००० सालापर्यंत सुध्दा मिळाले नव्हते. महाराष्ट्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे काम वाढवताना आम्ही केलेला एक प्रयत्न ज्याची चर्चा फारशी होत नाही त्याचा उल्लेख इथे केला पाहिजे.

महाराष्ट्रातले अनेक छोटे, छोटे समुदाय सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये कमालीचे उपेक्षित आहेत. त्यांना राज्याच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रात कोठेही स्थान नव्हते, ते पूर्णपणे उपेक्षित, वंचित आणि त्यामुळे शोषित होते. अशा समुदायांना संघटित करण्याचे काम कै.उत्तमराव पाटील व वसंतराव भागवत या दोघांच्या प्रयत्नामुळे भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून आम्ही साधारणपणे १९८० च्या दशकांतच सुरू केले होते. महाराष्ट्रात पक्षाचे काम कसे वाढवायचे याची चर्चा करण्यासाठी भाजपाचे पाच-सहा दिवसांचे एक चिंतन शिबीर झाले होते. त्या शिबिरात झालेल्या चर्चेत या समुदायांना एकत्र आणण्याच्या दिशेने काम करण्याचा निर्णय झाला. आम्ही त्या दिशेने काम सुरु केले. या निर्णयाचे वर्णन करण्यासाठी पुढे वापरात आलेला एक शब्द म्हणजे माधव डॉक्ट्रिन! हा शब्द महाराष्ट्रातले राजकीय लेखक नेहमी वापरत असतात.

महाराष्ट्रातले जे राजकीय क्षेत्राचे अभ्यासक आहेत- बहुतेक सगळे डावे आहेत-ते सगळे माधव डॉक्ट्रिन हा शब्द न चुकता वापरतात. कारण त्याच्या आधारावरती महाराष्ट्रातले सत्तेचे राजकारण बदलले. हा शब्द माळी, धनगर, वंजारी याच्यातून आला. त्यावेळेपर्यंत महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक क्षेत्रात ज्यांना कायम उपेक्षित रहावे लागत होते अशा सर्व वर्गांचे प्रतिनिधित्व माळी, धनगर, वंजारी यांनी केले. असे झाले तरी त्यांच्यापेक्षाही संख्येने लहान असलेले, एखाद्या जिल्ह्यापुरते, एखाद्या जिल्ह्याच्या दोन-चार तालुक्यापर्यंतच अस्तित्व असलेले असे अनेक समुदाय आहेत की जे त्यानंतरही उपेक्षित होते. त्यांनासुद्धा एकत्र आणण्याचा प्रयत्न भाजपाने केला. त्यावेळेपर्यंत या वर्गांना राजकारणामध्ये आवाज नव्हता, राजकारणामध्ये त्यांच्या प्रश्नांकडे कोणी बघत नव्हते.

**(पूर्वार्ध)**

# कलम 370 रद्द झाल्यानंतरची 6 वर्षे



धोरण, रणनीती आणि लोककल्याणाद्वारे देशकल्याण आणि लोक चळवळीद्वारे राष्ट्र उभारणी ही नव्या भारताची विचारधारणा आहे. अशा वेळी 'एक-भारत-श्रेष्ठ भारत'च्या संकल्पनेसह जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील लोकांचा विकास साधणे हा केंद्र सरकारचा सर्वोच्च प्राधान्यक्रम झाला आहे. ६ वर्षापूर्वी ५ ऑगस्ट २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कलम ३७० रद्द करुन ऐतिहासिक चूक दुरुस्त करत परिवर्तनकारी सुधारणांची नवी कहाणी लिहिली, ज्यामुळे जम्मू-काश्मीर तसेच लडाख हे भाग विकासाचे नवे मापदंड ओलांडत आहेत. यापूर्वी जम्मू-काश्मिर आणि लडाखमध्ये काही थोडक्या लोकांपर्यंत सीमित राहिलेला राज्यकारभार आता एका लोकाभिमुख सरकारच्या रुपात स्वतःची ओळख सशक्त करत आहे.

**हा** जयघोष आहे नव भारताच्या नेतृत्वाचा, ज्याचा ठाम निश्चय आहे, तो म्हणजे भूतकाळातल्या अनावश्यक श्रृंखलेत बद्ध राहायचे नाही. आजचा नव भारत, आपला वर्तमान काळ तर भक्कम करतच आहे, त्याचबरोबर भविष्यासाठीही स्वतःला सज्ञ करत आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखसंदर्भात ६ वर्षापूर्वी घेतलेला निर्णय विद्यमान सरकारच्या निर्धाराचे प्रतिबिंब आहे, ज्याच्या आश्वासन आणि निश्चयात सुस्पष्टताही आहे आणि ते पूर्णत्वाला नेण्याचे साहस आणि सामर्थ्यही आहे. दशकांपासून असलेली समस्या, जिचे निराकरण करणे अशक्य मानले जात होते, तिचे ५ ऑगस्ट २०१९ ला राष्ट्राने निरिकरण करत अभूतपूर्व पाऊल उचलले.

खरे तर जम्मू-काश्मीर आणि लडाख हे केवळ एक राज्य किंवा जमिनीचा तुकडा नाही, तर जम्मू-काश्मीर आणि लडाख म्हणजे भारताचा शिरोमुकुट आहे. तिथले अवघे जीवन, तिथला कण आणि कण, भारताची विचार धारा, भारताच्या सामर्थ्याला मजबूत करतो.'एक देश, एक विधान, एक निशान'हे स्वप्न साकार झाले आहे. कलम ३७० च्या तरतुदी हटविल्यानंतर जम्मू-काश्मीर आणि लडाख विकसित

करण्याचा संकल्प साकार करण्याच्या दिशेने आगेकूच करत आहे. ५ ऑगस्टला देशाच्या इतिहासातल्या या महत्वाच्या क्षणाला सहा वर्षे पूर्ण झाली आहेत, जेव्हा भारताच्या संसदेने कलम ३७० आणि ३५ (अ) रद्दबातल करण्याचा निर्णय घेतला होता. जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या समृद्धीची ही नवी सुरवात होती. या निर्णयाचा अर्थ म्हणजे या ठिकाणी भारताचे संविधान पूर्णतः लागू केले जाईल, जे थोर संविधान निर्मात्यांच्या दृष्टीला अनुरूप आहे. कलम ३७० रद्दबातल करण्यासह विकासाच्या लाभापासून वंचित समुदायासाठी सुरक्षा, सन्मान आणि नव्या संधी आल्या, त्याचबरोबर दशकांपासूनचा जम्मू-काश्मीरमधला भ्रष्टाचाराचा निपटाराही सुनिश्चित केला आहे. अशामध्ये हा स्वाभाविक प्रश्न आहे की, कलम ३७० आणि ३५ अ दशकांपासून कायम ठेवण्याचे कारण काय होते? तिथल्या नागरिकांना त्यांच्या मूळ अधिकारापासून वंचित का ठेवण्यात आले होते? मात्र विद्यमान सरकारची ओळख आहे, ती म्हणजे ते समस्या टाळतही नाही आणि त्या बाकी ठेवतही नाही. जे काम गेल्या ७० वर्षात झाले नाही ते २०१९ मध्ये दुसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार स्थापन झाल्यानंतर ७० दिवसात झाले. कलम ३७० आणि ३५ अ रद्दबातल करण्यासाठीचे विधेयक भारताच्या संसदेने दोन तृतीयांश बहुमताने मंजूर केले. पंतप्रधान मोदी म्हणाले,याचा अर्थ म्हणजे प्रत्येकाच्या मनात ही गोष्ट होती, मात्र सुरुवात कोणी करायची, पुढाकार कोणी घ्यायचा, याचीच प्रतीक्षा होती आणि देशवासीयांनी त्यांना हे काम दिले आणि त्यांनी ते पूर्ण केले.

**सहा दशकांहून अधिक कालावधीचे अंतर सध्याच्या केंद्र सरकारने स्वतःच्या ६ वर्षांहूनही कमी काळातच संपवून टाकले आहे. यावर्षीच्या ५ ऑगस्ट रोजी त्या ऐतिहासिक दिवसाला ६ वर्षे होत आहेत. अशावेळी, चला, आपण जम्मू- काश्मीर तसेच लडाख हे भाग प्रगती आणि समृद्धीच्या नव्या युगाच्या दिशेने कशी वाटचाल करत आहेत ते जाणून घेऊया.**

### सामाजिक न्यायाच्या दिशेने मोठे पाऊल

जम्मू-काश्मीरमध्ये घडणारा हा बदल म्हणजे केंद्र सरकारच्या गेल्या १०-१२ वर्षातल्या प्रयत्नांचा परिपाक आहे. शरणार्थी कुटुंबे असोत, वाल्मिकी समुदाय असो, सफाई कर्मचारी असोत सर्वांना त्यांचे लोकशाही हक्क मिळत आहेत. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास और सबका प्रयास' हा मंत्र विकसित जम्मू-काश्मीरचा पाया आहे. पाकिस्तानमधून आलेले शरणार्थी, वाल्मिकी समुदाय आणि सफाई कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळाला. वाल्मिकी समुदायाला अनुसूचित जाती श्रेणीचा लाभ मिळावा, ही अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण झाली आहे. प्रथमच अनुसूचित जमाती समुदायासाठी विधानसभेत जागा आरक्षित ठेण्यात आल्या आहेत.

**आमच्यासाठी ५ ऑगस्टचा निर्णय अढळ आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखला नव्या मार्गावर नेण्याचा निश्चयही अढळ आहे. ५ ऑगस्ट २०१९ ला जम्मू-काश्मीरमध्ये भारताचे संपूर्ण संविधान आणि कायदा लागू झाला. ७० वर्षांपासून जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या विकासात जो सर्वात मोठा अडसर होता, तो आम्ही ५ ऑगस्टला दूर केला.**

'पद्दारीजमाती, 'पहाड़ी जात समुदाय, 'गड्डा ब्राम्हण' आणि 'कोळी' या सर्व समुदायांनाही अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. पंचायत, नगर पालिका आणि नगर परिषदांमध्ये इतर मागास वर्ग (ओबीसी) आरक्षण प्रथमच लागू करण्यात आले आहे. काश्मीरमध्ये जेव्हा कलम ३७० आणि ३५ अ अंमलात होते, तेव्हा तिथल्या महिला अनेक अधिकारांपासून वंचित होत्या. महिलेने राज्याबाहेरच्या व्यक्तीशी लग्न केल्यास, वडिलोपार्जित संपत्ती मधला त्यांचा अधिकार समाप्त होत असे. या कलमाचा अडसर दूर झाल्यानंतर जम्मू काश्मीरच्या महिलांनाही ते सर्व अधिकारप्राप्त झाले, जे भारताच्या इतर राज्यांमधल्या महिलांना मिळत आहेत. इतकेच नव्हे दशकांपासून जम्मू-काश्मीर आणि लडाखला संविधानाच्या अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले होते. हा जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या लोकांवर आणि संविधानावरही अन्यायच होता. आता जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या नागरिकांनाही इतर राज्यांच्या नागरिकांप्रमाणेच अधिकार प्राप्त झाले आहेत. कारण देशाच्या एकतेला विद्यमान



जम्मू-काश्मीरच्या शत्रूंना धडा शिकविण्यामध्ये कोणतीही कसर ठेवली जाणार नाही, असे मी आश्वस्त करतो. इथली नवी पिढी, चिरस्थायी शांततेत आपले जीवन व्यतीत करेल. जम्मू-काश्मीरने प्रगतीचा जो मार्ग निवडला आहे तो आम्ही अधिक भक्कम करू.

■ नरेंद्र मोदी, पंतप्रधान

सरकारचे प्राधान्य आहे. पीएम आवास योजने अंतर्गत तयार होणाऱ्या बहुतांश घरांचा मालकी हक्क महिलांच्या नावावर आहे. हर घर नल से जल योजना, हजारो शोचालयांची उभारणी, आयुष्मान भारत योजने अंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचारांनी इथल्या लोकांचे जीवन सुलभ केले आहे. भारताच्या संविधानाने ज्या सामाजिक न्यायाचा विश्वास दिला आहे, तो विश्वास जम्मू-काश्मिरच्या सर्वसामान्य जनतेला प्रथमच मिळाला आहे.

### समुद्धी-शांतता-प्रगतीच्या मार्गावर आगेकूच

कलम ३७० च्या भेदभावपूर्ण तरतुदी रद्दबातल केल्यानंतर धरतीवरचा स्वर्ग मानले जाणारे जम्मू-काश्मीर आणि लडाख आता मुख्य प्रवाहात आल्याने देशाच्या इतर राज्यांच्या बरोबरीने आले आहे. कलम३७० रद्द झाल्यानंतर ८९० केंद्रीय कायदे अंमलात आणण्यात आले. राज्याचे २०५ कायदे रद्द करण्यात आले आणि १३० कायद्यात सुधारणा करून लागू करण्यात आले. सुरक्षित अधिकार, सशक्त जीवन यासाठी आर्थिक दृष्ट्या दुर्बलवर्गाला १० टक्के आरक्षण देण्यात आले, तर १५ नव्या इतर मागास वर्ग जातींचा आरक्षण लाभ ४ वरून वाढवून ८ टक्के करण्यात आला. त्याचबरोबर १० टक्के आरक्षण पहाडी, पद्दारी, कोईल, गडडाब्राम्हण यांना मिळू लागला आहे. एक भारत, श्रेष्ठ भारत या भावनेने जम्मू काश्मीर लडाखमधल्या लोकांच्या विकासाला केंद्र सरकारचे सर्वोच्च प्राधान्य राहिले आहे.

**(पूर्वार्ध)**

# गोरगरिबांच्या जीवनात क्रांती घडवणा-या 'जन-धन योजने'ची 11 वर्षे



> २८ ऑगस्ट, २०२५ रोजी 'पंतप्रधान जन-धन योजने'ला ११ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने गोरगरीब, कष्टकरी आणि गरजूंच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणणाऱ्या या योजनेचा आढावा घेणे योग्य ठरेल.

**१५** ऑगस्ट, २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरील आपल्या पहिल्या भाषणात 'जन-धन योजने'ची घोषणा केली. तोपर्यंत देशाला स्वातंत्र्य मिळून ६६ वर्षांचा कालावधी लोटला होता. त्यावेळी देशातील निम्याहून अधिक लोकसंख्येची बँक खाती काढली गेली नव्हती. याचा दुसरा अर्थ असा की, ५० कोटीहून अधिक लोक अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहातच नव्हते. ही परिस्थिती बदलण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'जन-धन योजने'ची घोषणा केली. गोरगरीब, कष्टकरी, मजूर, छोटे व्यवसाय करणारा वर्ग, कामगार, शेतमजूर या वर्गाचे कोणत्याच बँकेत खाते नव्हते. त्यामुळे सरकारी योजनांचे अर्थसहाय्य या वर्गापर्यंत पोहचवताना सरकारी यंत्रणेतील मध्यस्थ, दलाल मोठा मलिदा खात असत. गेल्या ११ वर्षात ५६ कोटी लोकांची 'जन-धन योजने'खाली बँक खाती उघडण्यात आली आहेत. 'जन-धन योजने'मुळे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात सरकारी योजनांचे अर्थसहाय्य (डीबीटी) जमा होऊ लागले आहे. 'पंतप्रधान किसान योजने'त देण्यात येणारे ६ हजार रु.चे अर्थसहाय्य शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होत आहे. मनरेगासारख्या योजनेतून मिळणारी मजूरीही बँक खात्यात जमा होत आहे. अशा अर्थसहाय्यासाठी लाभार्थ्यांना





सरकारी कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असत. सरकारी अधिकाऱ्यांची मिनतवारी करून, त्यांच्या हातावर 'दक्षिणा' ठेवून सरकारी योजनांचे अर्थसहाय्य, अनुदान मिळवावे लागत असे. १९८५ मध्ये मुंबईत काँग्रेसचे शताब्दी अधिवेशन झाले होते. या अधिवेशनात बोलताना त्यावेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी सरकारी अर्थसहाय्यातील, अनुदानातील फक्त १५ टक्के रक्कम लाभार्थ्यांपर्यंत पोहचते, उरलेली ८५ टक्के रक्कम मध्यस्थ हडप करतात, असे स्पष्टपणे सांगितले होते. काँग्रेसने देशाची सत्ता अनेक वर्षे भोगली आहे. मात्र काँग्रेसला गोरगरिबांची बँक खाती उघडणे जमले नव्हते. सामान्य माणसाला बँकांतून कर्ज मिळावे, यासाठी १९६९ मध्ये त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले होते. या निर्णयाचे विचारवंतांनी, पत्रकारांनी तोंड भरून कौतुक केले होते. कम्युनिस्ट विचारधारेच्या नेतेमंडळींनी या निर्णयाबद्दल श्रीमती इंदिरा गांधी यांची प्रशंसा केली होती. अनेक खाजगी बँका सरकारी मालकीच्या झाल्या तरी गोरगरिबांना काहीच फायदा झाला नव्हता. 'जन-धन योजने'ने अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिलेल्या गरीब, कष्टकरी, मजूर, कामगार, पथारीवाले, ऑटोरिक्षा चालक, चहा टपरी चालक, भाजी विक्रेते अशा मोठ्या वर्गाला सरकारी योजनांचे फायदे मिळवून दिले. या वर्गातील लोकांना व्यवसाय व अन्य कारणासाठी बँकांकडून कर्ज घेण्याचा मार्गही 'जन-धन योजने'मुळे खुला झाला आहे. ५६ कोटी खात्यांमध्ये २.६३ लाख कोटी रु. एवढी रक्कम जमा आहे.

'जन-धन योजने'त उघडली जाणारी बँक खाती झिरो बॅलन्सची असतात. या खातेदारांना रुपे-कार्ड मोफत मिळते. रूपे डेबिड कार्डवर २ लाखांचे अपघाती विमा संरक्षण दिले जाते. १० हजार रुपयांची ओव्हरड्राफ्ट सुविधाही या बँक खात्यावर मिळते. जन-धन, आधार आणि मोबाईल या तीन घटकांच्या एकत्रीकरणामुळे सरकारी योजनांचे अर्थसहाय्य लाटणाऱ्या मध्यस्थ आणि दलालांची छुट्टी करून टाकली आहे. 'पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजने'खाली गेल्या १० वर्षात १७ हजार ६०० कोटी रु. इतक्या रकमेची विमा भरपाई २२ कोटी खातेदारांच्या 'जन-धन' खात्यामध्ये जमा झाली आहे. सरकारच्या ३२१ योजनांचे अर्थसहाय्य, अनुदान जन-धन बँक खात्यामध्ये जमा केले जात आहे. 'आयुष्मान भारत', 'पंतप्रधान स्वनिधी योजना', 'पंतप्रधान पीक विमा योजना', 'पंतप्रधान गरीब कल्याण योजना', 'पंतप्रधान आवास योजना', पंतप्रधान उज्वला योजना, दीनदयाळ अंत्योदय योजना अशा विविध योजनांचे २५ लाख कोटी एवढे अर्थसहाय्य लाभार्थ्यांच्या 'जन-धन'खात्यात थेट जमा करण्यात आले. 'जन-धन योजने'मुळे बोगस लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याचे प्रकार बंद झाले. यामुळे सरकारची ४.३१ लाख कोटी एवढी बचत झाली आहे. गोरगरीब, कष्टकऱ्यांना पूर्वी बँका कर्ज देत नसल्यामुळे खाजगी सावकारांकडे जावे लागत असे. खाजगी सावकार भरमसाठ व्याजदर लावून गोरगरिबांची पिळवणूक करत असे. 'जन-धन योजने'मुळे गोरगरिबांची पिळवणूक आणि फसवणूक थांबली आहे. या योजनेचा सर्वात मोठा फायदा महिलांना झाला आहे. त्यामुळेच ५६ कोटी खातेदारांपैकी ३० कोटी खातेधारक महिला आहेत. 'जन-धन योजने'त ३८ कोटी रुपे-कार्ड मोफत वाटण्यात आली आहेत. सुमारे ८० लाख पीओएस मशीन बसविण्यात आली आहेत. 'जन-धन योजने'ला जागतिक स्तरावराही मान्यता मिळाली आहे. जागतिक बँकेने आपल्या २०२५ च्या अहवालात 'जन-धन योजने'मुळे आर्थिक समावेशकता साध्य झाल्याचे गौरवाने नमूद केले आहे. ■

# डिजिटल आरोग्य ओळखीसह निरोगी भारताचा पाया

भारतासारख्या १४० कोटींहून अधिक लोकसंख्या आणि भौगोलिक आव्हाने असलेल्या विशाल देशात सर्वांना आरोग्य सेवा सहज कशा मिळू शकतात? तंत्रज्ञानाच्या या युगात भारताने आरोग्य सेवा डिजिटल व्यवस्थेसोबत जोडून यावर उपाय शोधण्यासोबतच कोट्यवधी नागरिकांना त्या उपलब्ध करून देऊन आपली क्षमता आणि कार्यक्षमता सिद्ध केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२० रोजी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून घोषणा केल्यापासून राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियान म्हणून सुरू झालेला आरोग्य सेवांच्या डिजिटलीकरणाचा हा टप्पा आता आयुष्मान भारत डिजिटल अभियानासह ऐतिहासिक परिवर्तनाचे प्रतीक आहे.

**कोविड** महासाथीच्या काळात जेव्हा संपूर्ण जग स्तब्ध झालेले होते, तेव्हा सर्वांना डिजिटल तंत्रज्ञानाचे महत्त्व पुरेपूर कळले. कोविन ॲपसारख्या सेवांमुळे भारतीय आरोग्य सेवांमध्ये परिवर्तनाचे एक नवीन युग सुरू झाले. सर्वांसाठी मोफत लसीकरण मोहिमेअंतर्गत भारताने कोविन ॲपद्वारे जगातील सर्वात मोठी लसीकरण मोहीम शक्य करून दाखवली. राष्ट्रीय डिजिटल आरोग्य अभियानाच्या प्रारंभामुळे आरोग्य सेवांच्या डिजिटलायझेशनच्या एका



## राष्ट्रीय टेलिमेडिसिन सेवा ई-संजीवनी

मोफत आणि दूरस्थ वैद्यकीय सल्ला प्रदान करते. प्राथमिक आरोग्य सेवेसाठी हा जगातील सर्वात मोठे टेलिमेडिसिन प्लॅटफॉर्म म्हणून उदयास येत आहे. २०२० मध्ये प्रारंभ झाल्यापासून ई-संजीवनीने टेलि कन्सल्टेशनद्वारे ३६ कोटींहून अधिक रुग्णांना सेवा दिली आहे. ई-संजीवनी अंतर्गत १३० विशेषज्ञ डॉक्टर तसेच २,३२,२९१ आरोग्य सेवा प्रदाते जोडले गेले आहेत. मे २०२५ पर्यंत १०.४८ कोटी लाभार्थ्यांनी (U-WIN) वर नोंदणी केली आहे. यामध्ये ९३.९१ लाख प्रसूती, १.८८ कोटी लसीकरण सत्रे आणि ४१.७३ कोटी लसीचे डोस समाविष्ट आहेत.

(टीप : आकडे ६ एप्रिल २०२५ पर्यंतचे आहेत.)

## आयुष्मान भारत डिजिटल अभियानाचे महत्त्वपूर्ण घटक

● आयुष्मान भारत हेल्थ अकाऊंट (आभा)- एक १४ अंकी वैशिष्ट्यपूर्ण क्रमांक दिला जातो, जो सर्व आरोग्य नोंदी डिजिटल स्वरूपात संग्रहित करतो.

● आरोग्यसेवा व्यावसायिक निबंधनी (एचपीआर)- नोंदणीकृत आरोग्य सेवा व्यावसायिकांचा एक व्यापक डेटाबेस.

● आरोग्य सुविधा निबंधनी (एचएफआर)- संपूर्ण भारतात आरोग्य सेवांचे एक डिजिटल भांडार.

● एकीकृत आरोग्य इंटरफेस (युएचआय)- डिजिटल आरोग्य सेवा सुविधा प्रदान करणारे एक खुले नेटवर्क. या माध्यमातून रुग्णालये, डॉक्टर, प्रयोगशाळा सर्व एकाच मंचावर उपलब्ध.

● यू-विन- लसीकरण कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व अधिक वृद्धिंगत करण्यासाठी, सरकारने सार्वत्रिक लसीकरण (UIPP) कार्यक्रमाअंतर्गत U-WIN मंच हा डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. यू-विन हा एक डिजिटल मंच असून तो गर्भवती महिला आणि मुलांसाठी (०-१६ वर्षे) लसीकरण सुरळीत ठेवण्यासोबत त्याविषयी माग ठेतो.

नव्या युगाचा पाया रचला गेला.

प्रायोगिक प्रकल्प म्हणून यशस्वी अंमलबजावणीनंतर, संपूर्ण देशात आयुष्मान भारत मोहीम डिजिटल अभियानाच्या रूपात सुरू करण्यात आली. आता डिजिटल आरोग्य सेवेची ही क्रांती केवळ मोठ्या शहरांमधील आधुनिक सुविधांपुरती मर्यादित नाही तर दुर्गम गावांमध्येही आरोग्य सेवांची उपलब्धता सोपी, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनवत आहे. या अभियानाच्या माध्यमातून विशिष्ट आरोग्य आयडीद्वारे आरोग्य सेवा प्रदाते आणि रुग्णांना एकीकृत करून देशव्यापी डिजिटल आरोग्य परिसंस्था तयार केली जात आहे.

या योजनेअंतर्गत, प्रत्येक भारतीयाला आरोग्य ओळखपत्र दिले जाते. या आरोग्य खात्यात प्रत्येक चाचणी, प्रत्येक आजार, डॉक्टरांच्या भेटी, घेतलेली औषधे आणि निदान यांचे विवरण असते. एखादा रुग्ण स्थलांतरित झाला किंवा नव्या डॉक्टरकडे गेला तरी

देशाच्या आरोग्य क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, आम्ही एक राष्ट्रीय दृष्टिकोनावर, एका नव्या राष्ट्रीय आरोग्य धोरणावर काम केले आहे. स्वच्छ भारत अभियानापासून ते आयुष्मान भारत आणि आता आयुष्मान भारत डिजिटल मिशनपर्यंत, असे अनेक प्रयत्न याचाच एक भाग आहेत.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

## यशाची कहाणी सांगणारी आकडेवारी



● ७९ कोटींहून अधिक आयुष्मान भारत आरोग्य खाती (आभा).

● ४.१४ लाखांहून अधिक प्रमाणित आरोग्य सुविधा नोंदणीकृत.

● ६.६५ लाखांहून अधिक प्रमाणित आरोग्य व्यावसायिक नोंदणीकृत.

● ६१ कोटींहून अधिक आरोग्य नोंदी.

## आभा अशाप्रकारे मिळवता येईल

● आभा कार्ड मिळविण्यासाठी, तुम्हाला आभा कार्डच्या(https://abha.abdm.gov.in/abha/v3/) या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी लागेल.

● यानंतर आभा नंबर तयार करा, वर क्लिक करा. त्यानंतर तुम्हाला आधारद्वारे तुमचा आभा नंबर तयार करा किंवा 'ड्रायव्हिंग लायसन्सद्वारे'हा पर्याय मिळेल.

● आधार कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स पर्याय निवडल्यानंतर तुम्हाला तुमची माहिती द्यावी लागेल.

त्याला फक्त आभा क्रमांक (युनिक नंबर) सांगावा लागतो. टेलिमेडिसिन ई-संजीवनीद्वारे, कोणीही घरी बसून डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकतो. देशातील आरोग्य सेवांमध्ये धोरणात्मक सुधारणा आणि डिजिटल परिवर्तनाचा उल्लेख करत, जागतिक आर्थिक मंचाने एका अहवालात भारत डिजिटल आरोग्यात वैश्विक पथदर्शक आहे, असे म्हटले आहे. ■

# 35 लाख शेतक-यांच्या बँक खात्यामध्ये 3 हजार 900 कोटी विमा दावे रक्कम जमा

**शेतकरी** कल्याणासाठी सरकारची वचनबद्धता दर्शविताना, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राजस्थानमधील झुनझुनू येथे प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत विम्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डिजिटल पद्धतीने हस्तांतरित केली. सुमारे ३५ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ३ हजार ९०० कोटी रुपये वितरित करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री भागीरथ चौधरी यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. विविध राज्यांतील लाखो शेतकरी आणि लाभार्थी देखील या कार्यक्रमामध्ये आभासी पद्धतीने सहभागी झाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपण एका उल्लेखनीय भारताच्या निर्मितीचे साक्षीदार आहोत. राजस्थानला लवकरच यमुना, चंबळबरोबरच सिंधू नदीचे पाणी मिळेल, असे त्यांनी नमूद केले. पूर्वीच्या सरकारांमध्ये संपूर्ण तहसील किंवा तालुका यामधील पिके नष्ट झाल्यावरच पीक विमा भरपाई दिली जात होती, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जुन्या योजना रद्द केल्या आणि एक अशी विमा योजना सुरू केली की, ज्या अंतर्गत गावातील एकाच शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाले तरीही भरपाई दिली जाते.

शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी सरकार अनेक योजनांद्वारे काम करत आहे यावर त्यांनी भर दिला. पंतप्रधान–किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत, ३.७५ लाख कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरित करण्यात आले आहेत. २०१६ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू झाल्यापासून, शेतकऱ्यांना २.१२ लाख कोटी रुपये देण्यात आले आहेत. तसेच शेतकरी बांधवांसाठी खतांवर मोठ्या प्रमाणावर अनुदान दिले जाते, हे त्यांनी अधोरेखित केले. कृषी मंत्री चौहान यांनी इतर कल्याणकारी योजनांचाही यावेळी उल्लेख केला. सरकारने एमएसपी (किमान आधारभूत किंमत) दर वाढवले आहेत. 'पीएम–आशा' योजनेअंतर्गत (प्रधानमंत्री अन्नदाता उत्पन्न संरक्षण अभियान) गहू आणि धान खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या




खात्यात ४३.८७ लाख कोटी रुपये हस्तांतरित करण्यात आले आहेत. बाजार हस्तक्षेप योजना (एमआयपी) शेतकऱ्यांना इतर राज्यांमध्ये उत्पादन विकण्याची परवानगी देते आणि सरकार त्याचा वाहतूक खर्च करते. बनावट खतांच्या मुद्द्यावर गुन्हेगारांना शिक्षा केली जावी, यासाठी कठोर कायदा आणण्यासाठी पावले उचलली जात आहेत. दोषींवर कठोर कारवाई आणि तुरुंगवासाची शिक्षा सुनिश्चित करण्यासाठी आधीच काम सुरू केले आहे.

पिकांवर होणाऱ्या विषाणू हल्ल्याच्या बाबतीत, जर शेतकऱ्यांनी माहिती सामायिक केली किंवा छायाचित्रे पाठवली तर, शास्त्रज्ञांचा एक गट मदत करण्यासाठी ताबडतोब गावात पोहोचेल. यावेळी कृषी मंत्री चौहान म्हणाले की, खरीप हंगामानंतर, विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत, शास्त्रज्ञांचे पथक रब्बी पिकांच्या हंगामासाठी गावांना भेट देऊन शेती आणि संशोधन विषयक ज्ञान सामायिक करतील. भविष्यातील कृषी संशोधन शेती आणि शेतकऱ्यांच्या मागणी–केंद्रित असेल, ज्यामध्ये उत्पादन वाढवण्यासाठी मूग, उडीद, सोयाबीन आणि बाजरीसाठी दर्जेदार बियाणे विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. पंतप्रधानांचे कौतुक करताना चौहान म्हणाले; देशाचे सुदैव आहे की, त्यांचे नेतृत्व लाभले. कारण पंतप्रधान मोदी राष्ट्रीय हितांना अत्यंत महत्त्व देतात आणि पंतप्रधानांनी ग्वाही दिली आहे की, शेतकऱ्यांच्या हिताशी कधीही तडजोड केली जाणार नाही. यासाठी ते अगदी वैयक्तिक स्तरावर किंमत मोजावी लागली तरी ते सज्ज आहेत. या निर्णायक भूमिकेमुळे जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा अधिक मजबूत झाली आहे. ■

# अटल पेन्शन योजनेत ८ कोटींपेक्षा अधिक नोंदणी

**केंद्र** सरकारच्या प्रमुख सामाजिक सुरक्षा योजनांपैकी एक असलेल्या आणि निवृत्तीवेतन नियामक आणि विकास प्राधिकरणाद्वारे (PFRD) अटल पेन्शन योजनेने (PY) एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. चालू आर्थिक वर्षात (आर्थिक वर्ष २०२५-२६) ३९ लाख नवीन सदस्यांची नोंदणी होऊन एकूण नोंदणी ८ कोटींच्या पुढे गेली आहे. ही योजना ९ मे २०१५ रोजी सुरू झाली होती आणि यंदा आपली दशकपूर्ती साजरी करत असताना योजनेने हा टप्पा गाठला आहे. सर्व भारतीयांसाठी एक सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा प्रणाली तयार करण्याच्या दृष्टिकोनातून सुरू केलेली, अटल पेन्शन योजना ही एक स्वेच्छिक निवृत्तीवेतन योजना आहे, जी गरीब, वंचित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांवर लक्ष केंद्रित करते. या यशाचे श्रेय सर्व बँका, टपाल विभाग (DoP) आणि राज्यस्तरीय बँकर्स समिती/केंद्रशासित प्रदेश स्तरीय बँकर्स समिती (SLBCs/UTLBCs) आणि भारत सरकारच्या सातत्यपूर्ण पाठबळाला जाते. निवृत्तीवेतन नियामक आणि विकास प्राधिकरणाने नोंदणी वाढवण्यासाठी जनजागृती कार्यक्रम, प्रशिक्षण, बहुभाषिक माहितीपत्रके, प्रसारमाध्यम मोहिमा आणि नियमित पुनरावलोकनांद्वारे सक्रिय भूमिका बजावली आहे. अटल पेन्शन योजनेची रचना विशेषत्वाने 'संपूर्ण सुरक्षा कवच' (संपूर्ण सुरक्षा कवच) प्रदान करण्यासाठी केली आहे. ही योजना सदस्याला वयाच्या ६० वर्षांनंतर १ हजार ते ५ हजार रुपयांपर्यंत मासिक निवृत्तीवेतनाची हमी देते. सदस्याच्या निधनानंतर त्याच्या जोडीदाराला समान निवृत्ती वेतन आणि दोघांच्या मृत्यूनंतर नामनिर्देशित व्यक्तीला संपूर्ण जमा झालेला निधी परत दिला जातो. ही योजना १८ ते ४० वर्षे वयोगटातील सर्व भारतीय नागरिकांसाठी खुली आहे, मात्र जे नागरिक प्राप्तीकर दाता आहेत किंवा ज्यांनी पूर्वी प्राप्तीकर भरलेला आहे त्यांना या योजनेत सामील होता येणार नाही. ■

## अनुसूचित जातीतील २ कोटी २२ लाख विद्यार्थ्यांना केंद्र सरकारच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ

**अनुसूचित** जातीच्या विद्यार्थ्यांसाठी दहावी नंतरच्या शिक्षणासाठी मिळणारी शिष्यवृत्ती (पीएमएस) आणि उच्च दर्जाच्या शिक्षणाच्या योजनांद्वारे प्रदान करण्यात येणारी आर्थिक मदत यामुळे देशातील शैक्षणिक संस्था/महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षण घेत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास हातभार लागला आहे. यामुळे अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यास मदत झाली आहे. गेल्या पाच वर्षांत, अनुसूचित जातीतील २ कोटी २२ लाख ३१ हजार १३९ विद्यार्थ्यांना दहावीनंतर मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचा तर २० हजार ३४०च्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. या योजनांतर्गत अनुसूचित जातीचे विद्यार्थी आयआयटी, आयआयएम, आयआयआयटी, एम्स, एनआयटी, एनआयएफटी, एनआयडी, आयएचएम, एनएलयू यासारख्या महाविद्यालये, विद्यापीठे आणि संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत. ■

## हातमाग विणकरांसाठी योजना

**केंद्रीय** वस्त्रोद्योग मंत्रालय देशभरात राष्ट्रीय हातमाग विकास कार्यक्रम (एनएचडीपी) अंतर्गत हातमाग विणकर/कामगारांच्या कल्याणासाठी खालील योजना राबवत आहे. निर्धन परिस्थितीत राहणाऱ्या, ज्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी आहे अशा ६० वर्षांवरील पुरस्कार विजेत्या हातमाग विणकर/कामगारांना, दरमहा ८ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य आणि केंद्र/राज्य सरकार मान्यताप्राप्त/अनुदानित वस्त्रोद्योग संस्थांमधून पदविका / पदवीपूर्व /पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेण्यासाठी हातमाग विणकर/कामगारांच्या मुलांना (२ मुलांपर्यंत) वार्षिक २ लाख रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती. नैसर्गिक/अपघाती मृत्यू आणि पूर्ण/आंशिक अपंगत्वाच्या बाबतीत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पीएमजेजेबीवाय) आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना या विमा योजनांद्वारे सार्वत्रिक आणि किफायतशीर सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येत आहे. कच्चा कापूस आणि सूत, वस्त्र, तयार कपडे यासह कापड उद्योगांची एकूण निर्यात ३ वर्षात ३५ हजार ६४२ दशलक्ष अमेरिकी डॉलर्स झाली आहे. ■

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

# जगातील सर्वात मोठी सहकारी धान्य साठवणूक योजना

## ११ राज्यांमध्ये गोदामांची कामे पूर्ण

**केंद्र** सरकारने ३१ मे २०२३ रोजी सहकारी क्षेत्रात जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजनेला मंजूरी दिली होती, आणि त्यानंतर आता ती पथदर्शी प्रकल्प (पायलट प्रोजेक्ट) म्हणून सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत केंद्र सरकारच्या विविध विद्यमान योजनांच्या (उदा. कृषी पायाभूत सुविधा निधी, कृषी पणन पायाभूत सुविधा योजना, कृषी यांत्रिकीकरण उप-अभियान, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग औपचारिकीकरण योजनांचे इत्यादी) एकात्मिकीकरणातून प्राथमिक कृषी पतसंस्था स्तरावर गोदामे, कस्टम हायरिंग सेंटर्स, प्रक्रिया युनिट्स, रास्त दरातील दुकाने इत्यादी विविध कृषी पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासारख्या उद्दिष्टांचा अंतर्भाव आहे. या योजनेच्या पथदर्शी प्रकल्पांतर्गत, ११ राज्यांमधील ११ प्राथमिक कृषी पतसंस्थांमध्ये गोदामांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यातील नेरीपांगली विविध कार्यकारी सहकारी संस्था या प्राथमिक कृषी पतसंस्थेचाही यात अंतर्भाव आहे. याव्यतिरिक्त, प्रकल्पांतर्गत गोदामांच्या बांधकामासाठी ५०० पेक्षा जास्त प्राथमिक कृषी पतसंस्थाही निश्चित केल्या गेल्या आहेत. त्यासोबतच डिसेंबर २०२६ पर्यंत या गोदामांचे बांधकाम पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

केंद्र सरकारने येत्या पाच वर्षांत देशातील सर्व पंचायती आणि गावांमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्था/दुग्धोत्पादन केंद्र अर्थात डेअरी/मत्स्यपालन सहकारी संस्था स्थापन करण्याच्या योजनेलाही मान्यता दिली आहे. या उपक्रमाला राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (NDDB), राष्ट्रीय मत्स्यपालन विकास मंडळ (NFDB) आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश सरकारांचे सहकार्यपूर्ण पाठबळही मिळाले आहे. या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, भागधारकांसाठी उद्दिष्टे आणि कालमर्यादा दर्शवणारी मार्गदर्शिका १९ सप्टेंबर २०२४ रोजी जारी करण्यात आली आहे. राष्ट्रीय सहकारी माहितीसाठ्यानुसार, या योजनेला १५ फेब्रुवारी २०२३ रोजी मंजुरी मिळाल्यापासून,



देशभरात ३० जून २०२५ पर्यंत एकूण २२ हजार ९३३ नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्था, दुग्धोत्पादन केंद्र अर्थात डेअरी आणि मत्स्यपालन सहकारी संस्थांची नोंदणी झाली आहे, यात ५ हजार ९३७ एम-प्राथमिक कृषी पतसंस्थांचाही (M-PCS) समावेष आहे. या योजनेला मंजुरी मिळाल्यापासून स्थापन झालेल्या एम-प्राथमिक कृषी पतसंस्थांची राज्यनिहाय माहिती खाली परिशिष्ट-खख मध्ये दिली आहे. यात महाराष्ट्रातील १७७ तर गोव्यातील २४ एम-प्राथमिक कृषी पतसंस्थांचा समावेष आहे.

प्राथमिक कृषी पतसंस्था बळकट करण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकारने कार्यान्वित प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या संगणकीकरणासाठी २९२५.३९ कोटी रुपये रुपयांच्या एकूण आर्थिक खर्चासह प्रकल्पाला मंजूरी देखील दिली आहे. या प्रकल्पाअंतर्गत देशातील सर्व कार्यरत प्राथमिक कृषी पतसंस्थांना सामान्य ERP आधारित राष्ट्रीय सॉफ्टवेअरवरअंतर्गत आणणे, त्यांना राज्य सहकारी बँका (StCBs) आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाद्वारे (DCCBs) राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेशी जोडण्याची उद्दिष्टे सरकारने समोर ठेवली आहेत. या प्रकल्पांतर्गत ३१ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण ७३ हजार ४९२ प्राथमिक कृषी पतसंस्थांना मंजुरी देण्यात आली आहे. एकूण ५९ हजार ९२० प्राथमिक कृषी पतसंस्था ERP सॉफ्टवेअरवरमध्ये समाविष्ट केल्या गेल्या आहेत आणि ३० राज्ये/केंद्रशासित प्रदेशांनी या संदर्भातील हार्डवेअरची खरेदीही पूर्ण केली आहे. प्राथमिक कृषी पतसंस्था संगणकीकरण प्रकल्पांतर्गत, महाराष्ट्रातून एकूण १२ हजार प्राथमिक कृषी पतसंस्थांना मंजुरी मिळाली आहे. ■

# बीडीडी चाळधारकांचे घराचे स्वप्न साकार

**मुंबईकरांच्या** हक्काच्या घरांची स्वप्नपूर्ती करण्यासाठी शासन सातत्याने काम करीत आहे. आजचा चावी वितरण कार्यक्रमाने शासनाच्या या कार्यपद्धतीवर एकप्रकारे मोहर उमटविली आहे. बीडीडी चाळ वासियांना पुनर्विकासातून साकारलेल्या ५५६ सदनिकांचे वितरण ही मुंबईकरांच्या हक्काच्या घरांच्या स्वप्नपूर्तीची सुरुवात आहे. माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिर येथे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्यावतीने आयोजित ५५६ पुनर्वसन सदनिका वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला व्यासपीठावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार मिलिंद देवरा, आमदार सर्वश्री सुनील शिंदे, कालिदास कोळंबकर, सचिन अहिर, महेश सावंत, माजी आमदार सदा सरवणकर, किरण पावसकर आदी उपस्थित होते. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा दीर्घकाळाचा अडथळा शासनाने दूर करत सामान्य मुंबईकरांना त्यांच्या हक्काचे घर देण्याच्या दिशेने पाऊले टाकली.

आजवर २० ते २५ वर्षांपासून विविध कारणांनी हा प्रकल्प रखडला होता. शासनाने या प्रकल्पात विकासक न नेमता, थेट म्हाडा मार्फत हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला. जागतिक निविदा काढून काम हाती घेण्यात आले. जागेचा सर्वोत्तम वापर, सौर ऊर्जा, पावसाच्या पाण्याचा निचरा, कचरा व्यवस्थापन अशा आधुनिक सुविधा यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या प्रकल्पाचे भूमिपूजन झाल्यानंतरही अनेक अडचणी आल्या. मात्र सर्वांच्या सहकाऱ्याने अडचणी दूर झाल्या.

आता पहिल्या टप्प्यात सुमारे ५५६ कुटुंबांना चाव्या देण्यात येत आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये दुसरा व डिसेंबरमध्ये तिसरा टप्पा पूर्ण होणार असून, वरळी येथील सर्व बीडीडी चाळ वासियांना घर मिळणार आहेत. पोलिसांना घराचा दर ५० लाखांवरून केवळ १५ लाख रुपये ठरवला आहे. त्यामुळे पोलिसांनाही हक्काचे घर मिळणार आहे. ■

# राज्यात १५ हजार पोलिसांची भरती

**राज्य** पोलिस दलात १५ हजार शिपायांची भरती करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. २०२४-२५ च्या पोलीस शिपाई भरती प्रक्रियेस मान्यता देण्याबरोबरच २०२२ व २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही एक वेळ विशेष बाब म्हणून अर्ज करुन भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची परवानगी देण्यास मंजुरी देण्यात आली. महायुती सरकारने गेल्या तीन-साडेतीन वर्षात शासकीय कर्मचाऱ्यांची आणि पोलिसांची मोठ्या प्रमाणावर भरती केली आहे. फडणवीस यांनी ७५ हजार शासकीय पदभरतीचा निर्णयही काही काळापूर्वी जाहीर केला होता. दरवर्षी १०-१५ हजार पोलिस भरती करण्यात येत आहे. करोनामुळे पोलिस शिपायांची भरती होऊ शकली नव्हती. दोन-तीन वर्षे भरती न झाल्याने आणि या कालखंडात हजारो कर्मचारी निवृत्त झाल्याने पोलिस शिपायांचा तुटवडा निर्माण झाला होता. तेव्हा राज्य सुरक्षा महामंडळाकडून हंगामी किंवा तात्पुरत्या स्वरुपातही पोलिस शिपाई घेण्यात आले होते.

सरकारकडून आता नियमित पोलिस भरतीला प्राधान्य देण्यात येत आहे. राज्य पोलिस दलातील शिपायांची २०२४ मध्ये रिक्त असलेली आणि २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन ही भरती करण्यात येणार आहे. त्यामध्ये पोलिस शिपायांची पदे १० हजार ९०८ असून शिपाई वाहनचालक २३४, बॅण्डस् मॅन २५, सशस्त्र शिपाई २३९३, कारागृह शिपाई ५५४ यांचा समावेश आहे. पोलीस शिपाई व कारागृह शिपाई ही पदे गट क संवर्गातील आहेत. पोलीस शिपाई पदांसाठीची भरती प्रक्रिया जिल्हास्तरावर राबविण्यात येते. त्यासाठी ' ओएमआर ' आधारित प्रणालीद्वारे लेखी परीक्षा घेण्यात येईल. भरतीसाठी अर्ज मागविणे, अर्जाची छाननी, प्रक्रिया तसेच उमेदवारांची शारिरीक परीक्षा, त्यातून पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा यासाठी अनुषांगिक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार हे प्रशिक्षण व खास पथके विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांना देण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली. ■

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

# शेतकरी कर्जमाफीसाठी समिती

**■ महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती ■ गरजू, पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार**

**राज्यातील** शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय लांबणीवर पडला नसून निवडणूक काळात भाजपाने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करणार आणि गरजू व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांना सांगितले. महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, 'योग्य शेतकऱ्यांना कर्जमाफी' देण्यावर सरकार भर देत आहे. त्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे, ती शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करणार असून, त्या सर्वेक्षणानंतर गरजू आणि पात्र शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ मिळेल. कर्जमाफी ही 'मेरिट'वर झाली पाहिजे. ज्यांना खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार केला जाईल. समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला मदत करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

गुंठेवारीमध्ये अडकलेल्या घरमालकांना दिलासा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले, तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींची नोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिले जात आहे. संभाजीनगर आयुक्तांना २०११ पूर्वीच्या गुंठेवारीतील बांधकामांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जास्त आकारणी केली असल्यास ती कमी करून सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले. महसूल विभागातील अनेक जागांवर झालेली अतिक्रमणे, वर्ग-२ जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करणे आणि पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे काढणे यांसारख्या विषयांवर काम सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शैक्षणिक दाखल्यांसाठी लागणाऱ्या ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची अट रद्द करण्यात आली आहे. घर बांधण्यासाठी लागणाऱ्या मुरमासाठी रॉयल्टी घेतली जाणार नाही. तसेच सिंधी समाजाला जागा मिळवून देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. ■

# शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यासाठी नवे नियम

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक**

**राज्य** सरकारच्या विविध प्रकल्पांसाठी जमीन संपादन करण्याच्या प्रक्रियेमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी नवीन नियमावली तयार केली जाणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या या बैठकीत वित्त आणि नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, माजी आमदार पाशा पटेल यांच्यासह इतर उच्चपदस्थ अधिकारी उपस्थित होते.

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा हक्क आणि पारदर्शकतेचा अधिनियमा नुसार, संमती निवाड्याद्वारे जमीन घेताना शेतकऱ्यांना कमी किंमतीत जमीन विकता येईल का, अशा अनेक प्रश्नांवर या बैठकीत चर्चा झाली. यावेळी आशिष जयस्वाल यांनी खासगी व्यक्तींना जमीन खरेदी करण्याची परवानगी असताना सरकारला ती मिळत नाही, हा मुद्दा उपस्थित केला. तसेच, विशिष्ट कालावधीतील जमिनीच्या मूल्यांकनापेक्षा कमी दरात जमीन विकण्याची शेतकऱ्यांची इच्छा असल्यास त्यासाठी काय तरतूद असावी, यावरही त्यांनी भर दिला. कमी मोबदला दिल्यास वाद निर्माण होऊ शकतो, असे मत नागपूर विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी व्यक्त केले. तसेच शेतकऱ्यांशी चर्चा करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावर आशिष जयस्वाल यांनी, 'अधिनियमातील कलम २३ नुसार नवीन नियम तयार केल्यास शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी जमीन देण्यास अनेक लोक पुढे येतील,' असे सांगितले. शेतकऱ्यांशी चर्चा करून योग्य मोबदला ठरवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचा अधिकार देण्याबाबतही त्यांनी सुचवले. ■

# महाराष्ट्रातील दोन रेल्वेमार्गांसाठी ७,६३० कोटी मंजूर; रेल्वेचे जाळे आणखी वाढणार



**छत्रपती** संभाजीनगर ते परभणीदरम्यानच्या रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण, नागपूर ते इटारसीदरम्यान चौथ्या रेल्वेमार्गाची उभारणी यांसह ११,१६९ कोटी रुपये खर्चाच्या चार रेल्वे प्रकल्पांना आर्थिक व्यवहारांसंदर्भातील केंद्रीय मंत्रिमंडळ समितीने मंजुरी दिली. या प्रकल्पांचा महाराष्ट्र, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, ओडिसा, झारखंड या सहा राज्यांतील १३ जिल्ह्यांना फायदा होणार आहे. छत्रपती संभाजीनगर ते परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाच्या प्रस्तावाला ३१ जुलै रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यानंतर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्विटच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर-परभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाबाबतच्या निर्णयाची माहिती दिली. या मार्गामुळे रेल्वे प्रवास आणि माल वाहतूक अधिक गतिमान होणार आहे. यामुळे रेल्वेचे जाळे आणखी ५७४ किमीने वाढणार आहे. इटारसी ते नागपूर या चौथ्या रेल्वेमार्गासाठी ५,४५१ कोटी रुपये, छत्रपती संभाजीनगर-परभणी रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणासाठी २,१७९ कोटी रुपये, अलुआबारी रोड ते न्यू जलपाईगुडी रेल्वे मार्गासाठी १,७८६ कोटी रुपये आणि डांगोआपोसी-करौली रेल्वे मार्गासाठी १,७५२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. ■

# राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र प्राधिकरण!

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यासंदर्भात सादरीकरण बैठक संपन्न झाली.**

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी 'महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण (MSRR)' स्थापन करण्याची कार्यवाही सुरू करण्यास मंजुरी दिली. राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करून त्यांचे पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, नद्यांचे नैसर्गिक प्रवाह राखण्यासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी हे प्राधिकरण विकासात्मक भूमिका बजावेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. या प्राधिकरणाद्वारे नदी पुनरुज्जीवनासाठी डीपीआर व खोरे व्यवस्थापन योजना मंजूर करणे, अतिक्रमण, वीज, भूसंपादन यासंबंधी अडचणी सोडवणे, राष्ट्रीय योजनांसाठी निवडक प्रकल्पांची शिफारस करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये करण्यात येणार आहेत. या प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री तर पर्यावरण मंत्री उपाध्यक्ष असणार आहेत. यासोबतच पर्यावरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समिती कार्यरत राहील. या राज्यस्तरीय समितीमध्ये तांत्रिक तज्ज्ञ, वित्तीय व कायदेशीर सल्लागार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव तसेच आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांतील तज्ज्ञ सदस्य यांचा समावेश असेल. राज्यातील नद्यांचे शाश्वत पुनरुज्जीवन करण्यासाठी हे प्राधिकरण व्यापक काम करणार आहे. दैनंदिन कामकाजासाठी एमपीसीबीचे सदस्य सचिव प्रमुख असलेले एक समर्पित सचिवालयही स्थापन करण्यात येणार आहे. ■



नवी दिल्ली येथे भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम स्टार्टअप अंतर्गत अल्पसंख्यकांना उद्यमीना ॲवार्ड वितरण– उपस्थिती– राष्ट्रीय सह संघटन मंत्री शिवप्रकाश, राष्ट्रीय सरचिटणीस दुष्यंत कुमार, केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री जॉर्ज कुरियन, उत्तर प्रदेशचे अल्पसंख्यांक मंत्री दानिश अन्सारी, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दिकी, अब्दुल्ला कुटी आदी.



नांदेड– लाडक्या बहिणीचा लाडका भाऊ 'देवा भाऊ'– उपस्थिती– संघटन मंत्री संजय कोडगे, महानगराध्यक्ष अमर राजुरकर, ज्येष्ठ नेते प्रवीण साले, मंगाराणी अंबुलगेकर, कविता कळसकर, डॉ. शितल भालके, महादेवी मठपती, अनिता इंगोले, शततारका पांढरे, लक्ष्मी वाघमारे, लीना गायकवाड, अपर्णा मोकाटे, पुष्पा वानखेडे, वैशाली देबडवार, शितल खांडील, अमोल कदम, संजय ईगेवाड आदी.



वरळी पोलीस कॅम्प येथे मयुर कदम यांचा आत्मनिर्भर स्टॉल सुरू– उपस्थिती– मुंबई ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष नरेंद्र गावकर, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष शलाका साळवी, मुंबई सचिव प्रतीक कर्पे, सचिन शिंदे, संयोजक दीपक सावंत आदी.



सांगली जिल्ह्यातील काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ.सुधीर गाडगीळ, आ. सुरेश खाडे, आ. सत्यजीत देशमुख, आ. प्रवीण दरेकर, माजी आ. संग्राम थोपटे, माजी आ. संजय जगताप आदी.



पुणे– भोर आणि मुळशी तालुक्यातील राष्ट्रवादी शरद पवार गट तसेच विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार संग्राम थोपटे, आ. प्रसाद लाड, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, कार्यालय सहसचिव भरत राऊत आदी.




सांगली– कार्यकर्ता मेळावा व माजी नगरसेवक मनोज सरगर यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आ.सुधीर गाडगीळ, आ.सुरेश खाडे, आ.सत्यजित देशमुख, आ.गोपीचंद पडळकर, जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, जनसुराज्य पक्षाचे सुमित कदम आदी.



पुणे– काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, पुणे उत्तर (मावळ) जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, माजी आमदार संजय जगताप, माजी आमदार संग्राम थोपटे, पुणे दक्षिण जिल्हाध्यक्ष शेखर वडणे, यशवंत जगताप, अजित जगताप, सुहास जगताप, मनोहर जगताप, संतोष गिरने, भारत चोखंडे, मोहन जगताप, सुरेश काकडे, संतोष खोपडे, बंडु राउत, संजय चौरे, योगेश गिरने, संदीप जगताप, संतोष जगताप, मनोज म्हेंगे आदी.



वसई–विरार– उबाठा गट तसेच बविआच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, आ. राजन नाईक, आ. स्नेहा दुबे, 'उबाठा'चे नालासोपारा माजी जिल्हाप्रमुख पंकज देशमुख, माजी नगरसेवक व माजी उपजिल्हा प्रमुख किशोर पाटील, विभागप्रमुख संतोष राणे, रवि राठोड, शाखाप्रमुख धनाजी पाटील, उबाठाचे वसई शहर समन्वयक निलेश भानुशे, उप शहर प्रमुख प्रकाश देवळेकर आदी.



दक्षिण रायगड– बापूसाहेब सोनगीरे यांच्यासह विविध पक्षांतील पदाधिकाऱ्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, राष्ट्रवादी विभागप्रमुख मुकुंद जांबरे न्हावे, गोरेगावचे शिवसेना शहरप्रमुख प्रदीप गोरेगावकर, मनसे विभागप्रमुख अमोल पवार, मनसेचे मंदार महामुंणकर, भिरा गावाचे काँग्रेसचे अनिकेत महामुंणकर, पन्हळघर येथील शिवसेनेचे अनिल महाडिक, वैकुंठ पाटील आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com